नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १५२ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




मंगळवार, दि. ०५ मे २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### वीज वापरावर मोठी सवलत!

नागपूर (स. गांवकरी) : राज्यातील वीज ग्राहकांसाठी लागू करण्यात आलेल्या 'टाइम ऑफ डे' (टीओडी) सवलतीचा मोठा परिणाम दिसून येत असून, जुलै २०२५ पासून आतापर्यंत तब्बल ७० लाख ग्राहकांना एकूण २,२३५ कोटी रुपयांचा आर्थिक लाभ झाला. विशेषतः उच्चदाब औद्योगिक ग्राहकांना या योजनेचा सर्वाधिक लाभ झाला असल्याची माहिती महावितरणने दिली. वीज वापराच्या वेळेनुसार दरात सवलत देण्याच्या धोरणाला 'टीओडी' सवलत म्हटले जाते. राज्यात सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत वीज वापरास प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. जुलै २०२५ पासून १० किलोवॅटपेक्षा जास्त भार असलेल्या औद्योगिक व वाणिज्यिक ग्राहकांना या सवलतीचा लाभ दिला जात आहे. एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीत १५ टक्के, तर ऑक्टोबर ते मार्च या कालावधीत २५ टक्के सवलत देण्यात येत आहे.

### माशांचा खच आढळल्याने खळबळ

चिपळूण (स.गांवकरी) : चिपळूण शहरालगतच्या खेर्डी परिसरात नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर मेलेल्या माशांचा खच आढळून आल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. या धक्कादायक प्रकारामुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान झाल्याची भीती व्यक्त केली जात असून, मेलेल्या माशांमुळे पसरलेल्या तीव्र दुर्गंधीने स्थानिक नागरिकांचे जगणे असह्य झाले आहे. नदीच्या पाण्यावर तरंगणारे शेकडो मृत मासे पाहून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून, हा सर्व प्रकार औद्योगिक सांडपाण्यामुळेच घडल्याचा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे.

# राहुरीत अक्षय कर्डिले यांचा सहज विजय

## सर्व प्रतिस्पर्ध्यांची अनामत जप्त

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

राहुरी विधानसभेसाठी झालेल्या पोटनिवडणुकीच्या मतमोजणीत भाजपचे उमेदवार अक्षय शिवाजी कर्डिले १ लाख १२ हजार ५८७ इतक्या विक्रमी मतांनी विजयी झाले. इतर सर्व ६ उमेदवारांच्या अनामत रकमा जप्त झाल्या. विजय जाहीर होताच भाजप कार्यकर्त्यांनी मतदान केंद्राबाहेर गुलाल उधळून जल्लोष केला.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आमदार संग्राम जगताप, भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग व अनिल मोहिते यांच्या उपस्थितीत विजयी उमेदवार अक्षय कर्डिले यांनी निवडणूक निर्णय अधिकारी अनुपकुमार यादव यांच्याकडून प्रमाणपत्र स्वीकारले. मंत्री विखे यांनी अक्षय कर्डिले यांचा सत्कार केला. तसेच निवडणूक योग्य पद्धतीने हाताळल्याबद्दल प्रशासनालाही धन्यवाद दिले. भाजपचे अक्षय कर्डिले यांना एकूण १ लाख ४० हजार ९३ मते मिळाली तर त्यांचे लगतचे प्रतिस्पर्धी उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) गोविंद मोकाटे यांना २७ हजार ५०६ मते मिळाली. एकूण ४१२ टपाली मतदान झाले. त्यातील २९ मते बाद झाली. कर्डिले यांना २८३ मते मिळाली. वंचित बहुजन आघाडीचे संतोष शेळके यांना ५६९०, ठाकरे गटाचे बंडखोर रावसाहेब खेवरे यांना ७२९९, अपक्ष ॲड. अथर्व म्हसे ११४८, सूर्यभान उर्फ सुरेश लांबे १३६८, महेश हापसे यांना २०५१ तर नोटाला १६३२ मते मिळाली.

आज, सोमवारी सकाळी राहुरीमध्ये मतमोजणी प्रक्रियेस निवडणूक निर्णय अधिकारी अनुपकुमार यादव यांच्या नेतृत्वाखाली मतमोजणी प्रक्रियेस सुरुवात करण्यात आली. प्रथम टपाली मतदान मोजण्यात आले. एकूण १४ टेबलवर ११० कर्मचारी मतमोजणीसाठी नियुक्त करण्यात आले होते. दुपारी १ वाजता निकाल जाहीर होणे अपेक्षित होते. मात्र मोजणी प्रक्रिया रेंगाळल्याने तसेच मोजणी करताना बुथ क्रमांक १७ व १८ मधील मतदान यंत्र बंद पडल्याने व्हीव्हीपॅट चिठ्ठ्यांची मोजणी करून दुपारी ३ वा. निकाल जाहीर करण्यात आला. अक्षय कर्डिले यांच्या विजयाने आपल्याला मोठा आनंद झाला आहे. अशावेळी स्व. शिवाजी कर्डिले यांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीने, योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याच्या पद्धतीने तसेच सरकारच्या कामगिरीवर राहुरी मतदारसंघातील मतदारांनी शिक्कामोर्तब केले. माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे हा विजय सुकर झाला. त्याबद्दल त्यांना धन्यवाद. या विजयाचे सर्व श्रेय मुख्यमंत्री फडणवीस आहे यांना आहे. त्यांनी समन्वयाची भूमिका घेऊन निर्णय घेतले. त्याचा परिणाम विजयात झाला, अशी प्रतिक्रिया पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी व्यक्त केली.



### विखे यांच्या पालकत्वाच्या भूमिकेमुळे विजय - आमदार जगताप

निवडणुकीमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्याचबरोबर पालकमंत्री राधाकृष्ण विखे व माजी खासदार सुजय विखे यांनी पालकत्वाची भूमिका स्वीकारली. त्यातूनच मतदारांनी मोठा कौल दिला, त्याबद्दल त्यांचे आभार. मतदारांनी शिवाजी कर्डिले यांच्या कार्याला पसंती दिली आहे, असे आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले.

## सुनेत्रा पवार २ लाख १४ हजार मताधिक्याने विजयी



बारामती पोटनिवडणुकीत राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी २ लाख १४ हजार ९३ मताधिक्याने विजयी साकारला. त्यांना २ लाख १८ हजार ९३० मते मिळाली, तर त्यांच्याविरोधात असलेल्या २२ उमेदवार आणि 'नोटा' यांना ४८३७ मतांवर समाधान मानावे लागले. बारामतीत दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी २०१९ मध्ये केलेला मताधिक्याचा विक्रम उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मोडला. अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेत निधनानंतर ही पोटनिवडणूक बिनविरोध होण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. मात्र, २२ उमेदवारांनी माघार न घेतल्याने मतदान घ्यावे लागले. या निकालाची औपचारिकता बाकी होती. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या अजित पवार यांचा बारामतीतील मताधिक्याचा विक्रम मोडणार का, याकडे सर्वांचे लक्ष होते. अपेक्षेप्रमाणे त्यांनी विक्रमी मताधिक्य मिळविले. बारामती पोटनिवडणुकीसाठी मतदारांमध्ये निरुत्साह राहिल्याने सुमारे ५८.२७ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. या मतदारसंघात तीन लाख ८४ हजार ५७९ मतदार असून, त्यापैकी दोन लाख २४ हजार ८७ मतदारांनी मतदान केले. बारामतीतील मताधिक्याचा विक्रम दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावावर होता. अजित पवार यांनी २०१९ मध्ये भाजपचे तत्कालीन उमेदवार गोपीचंद पडळकर यांचा एक लाख ६५ हजार २६५ मताधिक्याने पराभव केला होता. हा विक्रम मोडून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या दोन लाख १४ हजार ९३ मताधिक्याने विजयी झाल्या.

## प. बंगालमध्ये तृणमुलचा तंबू उखाडला - आशिष शेलार

मुंबई : (स. गांवकरी)

पं. बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या सरकारच्या अन्यायी, अत्याचारी आणि लांगुलचालनाच्या राजकारणामुळे तृणमुल काँग्रेस पक्षाचा तंबू उखाडला गेला आहे, अशी प्रतिक्रिया भाजपचे नेते आणि सांस्कृतिक मंत्री ॲड आशिष शेलार यांनी भाजपने पं. बंगालसह तीन राज्यांत मिळविलेल्या यशावर भाष्य करताना व्यक्त केली. जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वावर विश्वास दर्शवत भाजपला राज्याच्या निवडणुकांमध्ये अभुतपूर्व यश मिळवून दिले आहे. तसेच, महाराष्ट्रातील पोट निवडणुकांमध्ये महायुतीने यश मिळविले आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. एसआयआरचा भाजपच्या विजयाला हातभार लागला का, या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, सकाळी सूर्य, संध्याकाळी चंद्र उगविल्याचे, रात्रीचे तारे लुकलुकल्याचे ज्यांना दिसत नाही, त्यांच्या डोळ्यांवर पट्टी आहे. त्यांना अंधारच दिसणार. त्यांच्याविषयी काहीच बोलता येत नाही. पं बंगालच्या यशात एसआयआरचा हात आहे, असे विरोधक म्हणत असतील तर केरळचे काय, असा प्रश्न शेलार यांनी केला.

## रत्नागिरीत जलसाठ्यांची धोक्याची घंटा; तीन धरणे कोरडी

रत्नागिरी : (स. गांवकरी)



उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असताना त्याचा फटका आता जिल्ह्यातील जलसाठ्यांनाही बसू लागला आहे. पाणीसाठ्यांची पातळी झपाट्याने घसरत असून, काही धरणे कोरडी पडल्याने आगामी काळात पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. जिल्ह्याची एकूण पाणी साठवण क्षमता ४१९.०९३ दलघमी असताना सध्या केवळ १८६.७६३ दलघमी पाणी उपलब्ध आहे. एकूण उपयुक्त साठ्याच्या तुलनेत ही टक्केवारी ४४.५६ टक्क्यांवर घसरली आहे. ही स्थिती चिंताजनक मानली जात आहे. दरम्यान, केळंबा, पणदेरी आणि टांगर ही तीन धरणे पूर्णपणे कोरडी पडली असून त्याठिकाणी उपयुक्त पाणीसाठा शून्यावर आला आहे. तळवडे (०.०२%), तेलेवाडी (०.३४%) आणि कोंड्ये (५.७५%) या प्रकल्पांतील पाणीसाठाही अत्यंत नगण्य पातळीवर पोहोचला आहे. अनेक लघु प्रकल्पांमध्ये साठा १० ते २० टक्क्यांच्या दरम्यान असल्याने ग्रामीण भागातील पाणीपुरवठा विस्कळीत होण्याची भीती व्यक्त होत आहे. असे असले तरी काही मध्यम व मोठ्या प्रकल्पांमुळे जिल्ह्याला तात्पुरता दिलासा मिळत आहे. ओझर धरणात ८४.२४ टक्के, गुहागरमध्ये ८३.५६ टक्के, चिंचवाडीमध्ये ७५.३८ टक्के, तर गडनदी आणि अर्जुना प्रकल्पांत अनुक्रमे ६२.५० आणि ६०.८८ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. मात्र मुचकुंदी प्रकल्पाची पातळी ३० टक्क्यांपर्यंत खाली आल्याने चिंतेत भर पडली आहे. मे महिन्यात उष्णतेची तीव्रता आणखी वाढण्याचा अंदाज असून बाष्पीभवनाचा वेगही वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर उभे ठाकले आहे. अनेक भागांत येत्या काही आठवड्यांत तीव्र पाणीटंचाई जाणवण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# जिथे अजितदादांनाच न्याय नाही, तिथे सामान्यांच्या न्यायाचे काय?

## नसरापूर अत्याचार प्रकरणावरून रोहित पवारांचा सरकारवर निशाणा



कराड : (स. गांवकरी)

नसरापूर येथील अल्पवयीन बालिकेवरील अत्याचार आणि हत्या प्रकरणानंतर न्यायासाठी धावलेल्या पीडित कुटुंबीयांवरच पोलिसांनी लाठीचार्ज केल्याच्या घटनेने संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) नेते, आमदार रोहित पवार यांनी सरकारवर निशाणा साधला, 'ज्यांना अजितदादांनाच न्याय देता येत नाही, ते सर्वसामान्यांना काय न्याय देणार? असा थेट सवाल त्यांनी केला.

माजी उपपंतप्रधान (कै.) यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीस्थळी सोमवारी अभिवादन केल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधत सरकारच्या कार्यपद्धतीवर कोरडे ओढले. कराडचे उपनगराध्यक्ष पोपट साळुंखे, माजी नगराध्यक्ष ॲड. विद्याराणी साळुंखे, नंदकुमार बटाणे, सौरभ पाटील आदींची या वेळी उपस्थिती होती.

रोहित पवार म्हणाले, नसरापूरमधील घटनेत पीडित कुटुंब न्यायाच्या अपेक्षेने धडपड करत असताना, त्यांच्यावरच लाठीचार्ज होणे, ही अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक बाब आहे. प्रशासनाने अशा संवेदनशील प्रकरणात संयमाने वागणे अपेक्षित असताना, उलट कठोर कारवाई केल्याने सरकारच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एका बाजूला पीडित कुटुंब न्यायासाठी आक्रोश करत असताना, दुसरीकडे मुख्यमंत्री लग्न समारंभात व्यस्त असतात. अशा वागण्यामुळे समाजात चुकीचा संदेश जात असल्याचे त्यांनी नमूद केले. राजकीय घडामोडींवर बोलताना, त्यांनी बच्चू कडू यांच्या शिवसेना प्रवेशावर टीका केली. सत्ता, आमदारकी आणि मंत्रिपदाच्या अपेक्षेने त्यांनी निर्णय घेतला असावा. मात्र, आता त्यांना अपेक्षित पद मिळेलच असे नाही, असे सूचक विधान त्यांनी केले.

### शक्ती कायद्याकडे केंद्राचे दुर्लक्ष

देशात 'शक्ती कायदा' लागू करण्याची मागणी वारंवार होत असतानाही त्याकडे केंद्र सरकारकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. महाराष्ट्रात दर तासाला बलात्काराची घटना होते, हे अतिशय चिंताजनक आहे. मागणी असूनही शक्ती कायद्याकडे दुर्लक्ष करण्यावरून महिलांच्या सुरक्षेबाबत सरकारची भूमिका दुटप्पी असल्याची टीका रोहित पवारांनी एका प्रश्नावर बोलताना केली.

### मतदानापासून वंचित ठेवणे संविधानविरोधी

पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांनी चांगली लढत दिली. परंतु, याठिकाणी मोठ्या प्रमाणात मतदारांना मतदानापासून वंचित ठेवण्यात आले, जे संविधानाच्या विरोधात आहे. अशा प्रकारच्या गोष्टी महाराष्ट्रात होऊ नयेत, यासाठी सर्व पक्षांनी सतर्क राहणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले.



## थोडक्यात पण महत्वाचे



### नारायणगाव येथील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार !

नारायणगाव (स. गांवकरी) : नारायणगाव येथील ग्रामोन्नती मंडळाच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेना विभागातील २०२५/२५ या शैक्षणिक वर्षात एकूण दहा कॅडेटची वेगवेगळ्या शासकिय सेवेत निवड झाली. यात पोलीस उपनिरीक्षक, एअर फोर्स , सेंट्रल गव्हर्मेंट सेक्युरिटी गार्ड , इंडियन डिटेक्टिव्ह फोर्स व पोलीस दलामध्ये भरती झालेल्या या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार कृषीरत्न व ग्रामोन्नती मंडळ कार्याध्यक्ष अनिलतात्या मेहेर याच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये एमपीएससी मार्फत झालेल्या परीक्षेत पोलीस उपनिरीक्षकपदी सुदर्शन उर्फ दिनेश सुखदेव माताडे याची निवड झाली.तर समाधान अप्पा रासकर,अभिषेक प्रल्हाद वायकर,विक्रम संतोष मधे,नयना तान्हाजी बोम्बे,यांची पुणे शहर पोलीस दलात, अक्षदा अनिल डोंगरे,दुर्गा सिकंदर लोखंडे यांची पिंपरी चिंचवड पोलीस दलात,शिवम दत्तात्रय वाणी याची इंडियन डिटेक्टिव्ह फोर्स मध्ये,यश योगेश गरुड याची हवाई दलात, तसेच प्रवीण तुकाराम कानडे याची सेंट्रल गव्हर्नमेंट सेक्युरिटी गार्डमध्ये निवड झाली आहे. या सर्व विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी, महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन एनसीसीचे कॅप्टन डॉ.दिलीप शिवणे यांनी केले.



### वारुळवाडी साठी स्वतंत्र तलाठी कार्यालयाचे उद्घाटन !

नारायणगाव (स. गांवकरी) : नारायणगाव वारुळवाडी (ता.जुन्नर) या जोडगावांच्या वाढत्या लोकसंख्येमुळे तलाठी कार्यालयावरील वाढता ताण पाहता वारुळवाडी येथे स्वतंत्र तलाठी कार्यालयाची गरज निर्माण झाली होती. त्या अनुषंगाने सरपंच विनायक भुजबळ व पॅनेल प्रमुख संजय वारुळे यांनी सातत्याने पाठपुरावा करून वारुळवाडीसाठी स्वतंत्र कार्यालय मंजूर करून आणले. आज या कार्यालयाचा वारुळवाडी ग्रामपंचायतीच्या जुन्या जागेत शुभारंभ करण्यात आला. या नवीन कार्यालयामुळे नारायणगावच्या तलाठी कार्यालयावरचा ताण कमी होणार आहे.हे कार्यालय सुसज्ज असून मंडलाधिकाऱ्यासाठी देखील येथे जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. वारुळवाडीच्या नागरिकांनी आता या नवीन कार्यालयाचा उपयोग करून घ्यावा,असे आवाहन सरपंच विनायक भुजबळ यांनी केले आहे. याप्रसंगी नारायणगावचे उपसरपंच योगेश पाटे, मंडलाधिकारी शितल गर्जे, नवीन कायर्यालयाच्या तलाठी वर्षा लांडे, पंचायत समीती सदस्या जयश्री बनकर, संजय वारुळे, आशिष फुलसुंदर, माजी सरपंच देवेंद्र बनकर, आत्माराम संते, जंगल कोल्हे, सचीन वारुळे, परशुराम वारुळे, प्रकाश पाटे, अरविंद मेहेर, रमेश भुजबळ, रमेश मेहेत्रे, सुशांत भुजबळ, जुबेर शेख आदी मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते. किरण गुंजाळ यांनी सुत्रसंचालन केले सरपंच विनायक भुजबळ, उपसरपंच प्रकाश भालेकर, सदस्य ज्योती संते, राजश्री काळे वारुळ वाडी ग्रामपंचायतचे कर्मचारी यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.




### निजामुद्दीन कुरेशी उर्दू कनिष्ठ महाविद्यालयचा दैदिप्यमान निकाल

वसमत (स. गांवकरी) : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा बारावी (HSC) परीक्षेचा निकाल दि. 2 मे 2026 रोजी जाहीर झाला असून, वसमत शहरातील निजामुद्दीन कुरेशी उर्दू कनिष्ठ महाविद्यालयाने पुन्हा एकदा उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा 90 टक्के तर कला शाखेचा 78 टक्के इतका समाधानकारक निकाल लागला आहे. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्थेच्या सक्षम व्यवस्थापनामुळे हे यश शक्य झाल्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेने महाविद्यालयाचे नाव उज्वल केले असून, पालक आणि शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रियाजुद्दीन कुरेशी, उपाध्यक्ष मुजाहेद शाकेर, सचिव काफिया परवीन, तसेच रत्नमाला शिंदे, मसरूर अहमद खान, नदीमुद्दीन कुरेशी, रोमान कुरेशी आदी मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य जावेद हाश्मी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मार्गदर्शन केले. यावेळी जाधव सर, वाजेदा मॅडम, लुबना मॅडम, याहया मॅडम आदी शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत त्यांचा सत्कार केला. यावेळी बोलताना प्राचार्यांनी सांगितले की, "विद्यार्थ्यांनी प्रामाणिक परिश्रम, नियमित अभ्यास आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा योग्य उपयोग करून हे यश मिळवले आहे. भविष्यातही महाविद्यालय अशाच प्रकारे गुणवंत विद्यार्थ्यांची परंपरा पुढे नेईल." महाविद्यालयात या यशानिमित्त छोटेखानी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले व त्यांच्या उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. एकूणच, निजामुद्दीन कुरेशी उर्दू कनिष्ठ महाविद्यालयाने बारावी निकालात नोंदवलेले हे यश वसमत शहरासाठी अभिमानास्पद ठरत असून, शिक्षण क्षेत्रात संस्थेची मजबूत ओळख पुन्हा अधोरेखित झाली आहे.

### बारावी परीक्षेत प्राजक्ता सावंतचे घवघवीत यश



नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : कडक शिस्त आणि सिसीटिव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीत पार पडलेल्या बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला असून, यात अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचा झेंडा फडकवला आहे. या परीक्षेत प्राजक्ता सावंत हिने उत्कृष्ट गुणांसह यश संपादन करून कौतुकास्पद कामगिरी केली आहे. यावर्षी कॉपीमुक्त अभियान आणि पारदर्शकतेसाठी बोर्डाने परीक्षा केंद्रांवर सिसीटिव्ही कॅमेऱ्यांचे जाळे विणले होते.

# द्वारका कोंडीवरून आमदार फरांदे संतापल्या

### परिस्थिती न बदलल्यास थेट आंदोलनाचा इशारा



नाशिक : (स. गांवकरी)

द्वारका परिसरता गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या संथ गती कामामुळे नागरिक वाहतूक कोंडीमुळे त्रस्त झाले आहे.याबाबत वाढत्या तक्रारी लक्षात घेता सोमवारी दि. ४ आमदार देवयानी फरांदे यांनी द्वारका परिसरातील या कामाचा अचानक केलेल्या पाहणीदौऱ्यात पाहणीत प्रशासनाचा आणि ठेकेदाराचा मोठा 'गोंधळ' उघडकीस आला. कामातील ढिसाळपणा आणि नियोजनाच्या अभावावर संताप व्यक्त करत आमदारांनी अधिकाऱ्यांची भररस्त्यात कानउघाडणी केली, तर बेशिस्त वाहनधारकांना शिस्त लावण्यासाठी थेट गाड्यांची हवा सोडण्याचे आदेश दिले.

वाहतूक नियंत्रण करण्यासाठी ठेकेदाराने १२ वॉर्डन नेमल्याचा दावा केला होता.

मात्र आमदारांच्या 'रियालिटी चेक'मध्ये या दाव्यातील हवाच निघून गेली. प्रत्यक्षात कागदावर ७ वॉर्डन दिसले आणि जागेवर तर केवळ २ जण कर्तव्यावर होते. "बाकीचे वॉर्डन फक्त कागदावर पगार लाटण्यासाठी आहेत का?" असा सवाल करत फरांदे यांनी ठेकेदाराला चांगलेच झापले.

वॉर्डन गायब असल्याने आणि पोलीस यंत्रणेचे दुर्लक्ष असल्याने द्वारका चौकात वाहतूक व्यवस्थेचा पूर्णतः बोजवारा उडाला असल्याचे या पाहणीत स्पष्ट झाले.सर्व्हिस रोडवर अनधिकृतपणे उभ्या असलेल्या रिक्षा, खासगी ट्रॅव्हल्स आणि बेशिस्त पार्किंगमुळे रस्ते अरुंद झाले आहेत. काठेगल्लीकडे जाणाऱ्या मार्गावर रस्त्यातच पार्क केलेल्या दुचाकी पाहून आमदारांचा पारा चढला. त्यांनी पोलिसांना सूचना देत थेट या गाड्यांची हवा सोडण्यास लावली.

"जर रस्ता अडवून कोणी वाहन उभे करत असेल, तर त्यांच्यावर तात्काळ कठोर कारवाई करा," असे आदेश त्यांनी उपस्थित पोलीस प्रशासनाला दिले. आमदार फरांदे यांनी केवळ सूचना देऊन न थांबता प्रशासनाला गुरुवारी (ता. ७) पर्यंतचा 'अल्टिमेटम' दिला आहे. जर ठेकेदाराने याबाबतीत सुधारणा नकेल्यास थेट रस्त्यावर उतरत आंदोलन करण्याचा इशारा आमदार फरांदे यांनी दिला आहे.

### फरांदे यांनी दिल्या या सूचना

- काठेगल्लीकडून येणारी रिक्षाची वाहतूक भाभानगर, पखाल रोडमार्गे वळवा.
- द्वारका परिसरातील अनधिकृत रिक्षा स्टँड हटवून पर्यायी व्यवस्था करा.
- धुळीचा त्रास कमी करण्यासाठी कामाच्या ठिकाणी दिवसातून दोनदा पाणी मारा.
- सर्व्हिस रोडवरील अतिक्रमण २४ तासांत साफ करा.

### गुरुवारी पुन्हा पाहणी करणार

"प्रशासनाने नाशिककरांना वेठीस धरू नये.सोमवारच्या या पाहणी दौऱ्यात फक्त समज दिली आहे, पण गुरुवारी पुन्हा पाहणीला येईल तेव्हा परिस्थिती जैसे थे दिसली, तर मी स्वतः प्रशासनाविरुद्ध रस्त्यावर उतरून आंदोलन करणार आहे.-,आमदार देवयानी फरांदे

## लेखक सचिन गायकवाड यांचा मिरजगावात सन्मान !



कर्जत : (स. गांवकरी)

कर्जत तालुक्यातील रातंजन येथील सामाजिक कार्यकर्ते व प्रसिद्ध लेखक सचिन गायकवाड लिखित 'ड्रेस कोड' या कादंबरी पुस्तक दिल्ली येथे जंतर - मंतर या ठिकाणी नुकतेच प्रकाशित करण्यात आले आहे. त्यानिमित्ताने भारत विद्यालयाचे माजी विद्यार्थी सचिन गायकवाड यांनी लिहिलेल्या या कादंबरीबद्दल मिरजगाव येथील भारत विद्यालयात त्यांचा शिक्षकांच्या हस्ते शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक किशोर खुरंगे, फरताडे सर, तांबोळी, गवारे, रसाळ यांच्यासह सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर, भगिनी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. खुरांगे म्हणाले, कादंबरीचा सत्कार म्हणजे केवळ लेखकाचा सत्कार नाही, तर त्या विचारांचा, त्या विश्वाचा आणि मराठी साहित्याचा केलेला सन्मान असतो. तर यावेळी गायकवाड म्हणाले, आपण शिकलेल्या शाळेत शिक्षकांकडून झालेला सन्मान लाखमोलाचा असून आयुष्यातील अविस्मरणीय क्षण आहे. शिक्षकांनी पाठीवर टाकलेली शाब्बासकीची थाप ही नेहमीच पुढील वाटचालीसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल.




## शेठ टी.जे. एज्युकेशन सोसायटी येथे महाराष्ट्र दिन उत्साहात

### ध्वजारोहणाने विद्यार्थ्यांत देशभक्तीची जागृती!

ठाणे : (स. गांवकरी)

शेठ टी.जे. एज्युकेशन सोसायटी अंतर्गत येणाऱ्या सर्व शाळांच्या वतीने शेठ टी.जे. हायस्कूलच्या प्रांगणात महाराष्ट्र दिनानिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात उत्साहपूर्ण वातावरणात ध्वजारोहण करून महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष श्री. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या शुभहस्ते ध्वजाला मानवंदना देण्यात आली. यावेळी शेठ टी.जे. हायस्कूल व ज्युनियर कॉलेजच्या प्राचार्या श्रीमती मनिषाबेन ठक्कर, महाविद्यालयाच्या उपप्राचार्या श्रीमती मानोशी बागची, इंग्लिश स्कूल कॉलेजच्या प्राचार्या श्रीमती लिडियान, श्री. पुरणि सर तसेच सर्व शाळांचे प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र राज्य स्थापनेचा इतिहास व महाराष्ट्राच्या प्रगतीतील योगदान याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली असून हा दिवस राज्याच्या एकात्मता, विकास आणि समाजसेवेच्या परंपरेची आठवण करून देणारा असल्याचे सांगण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येक नागरिकाने आपले योगदान देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. "उत्कृष्टतेच्या दिशेने टाकलेले प्रत्येक पाऊल महाराष्ट्राला अभिमानाने पुढे नेईल," असा प्रेरणादायी संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, राज्याभिमान आणि सामाजिक जबाबदारीची भावना अधिक दृढ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

### पत्रकार संजय गायकर यांच्या पाठपुराव्याची दखल

## ब्राम्हणवाड्यात एचपी गॅसच्या ९५ टाक्यांचे वितरण!

ब्राम्हणवाडा : (स. गांवकरी)

दैनिक समर्थ गांवकरीचे वृत्तसंपादक तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ अकोले संपर्कप्रमुख पत्रकार संजय भाऊ गायकर यांनी एचपी गॅस तुटवड्याबाबत केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची दखल घेत आज दिनांक २ मे रोजी सायंकाळी सुमारे साडेसहा वाजेपर्यंत गोविंद एचपी गॅस एजन्सी, डोंगरगाव यांची गाडी ब्राम्हणवाडा येथे दाखल झाली यावेळी जवळपास ९५ गॅस टाक्यांचे वितरण करण्यात आले.




पूर्वतयार यादीमध्ये समाविष्ट असलेल्या सर्व लाभार्थींना नियोजनबद्ध पद्धतीने गॅस टाक्या वितरित करण्यात आल्या. संबंधित ग्रामस्थांनी वेळेत उपस्थित राहून या वितरणाचा लाभ घेतला.

माहितीनुसार, मार्च ते मे या कालावधीत ब्राम्हणवाडा गावात एचपी कंपनीच्या केवळ १७ टाक्याच उपलब्ध झाल्या होत्या. एस. बी. दिवेकर गॅस एजन्सीकडून गावात नियमित पुरवठा होत नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

या गंभीर समस्येची पत्रकार संजय गायकर यांनी दखल घेत १ मे रोजी यासंदर्भात वृत्त प्रसिद्ध केले, तसेच संबंधित विभागांकडे ऑनलाईन तक्रारी व ई-मेलद्वारे पाठपुरावा केला. त्यानंतर प्रशासन व संबंधित यंत्रणांनी तातडीने हालचाल करून दुसऱ्याच दिवशी गॅस टाक्यांचा पुरवठा उपलब्ध करून दिला. गॅस तुटवड्याच्या प्रश्नावर त्वरित कार्यवाही झाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण असून, "पत्रकारितेमुळे आमचा प्रश्न सुटला" अशा भावना व्यक्त करत ग्रामस्थांनी पत्रकार संजय गायकर यांचे आभार मानले.

## कै. दीपक उर्फ शरद उत्तम वाघ यांचे अपघाती दुःखद निधन

कळवण : (स. गांवकरी)

कळवण तालुक्यातील शिरसमणी येथील रहिवासी, SRPF जवान तथा पोलीस दलातील कर्तव्यदक्ष जवान कै. दीपक उर्फ शरद उत्तम वाघ यांचे दिनांक ३ मे २०२६ रोजी अपघाती दुःखद निधन झाले. त्यांच्या अकाली जाण्याची बातमी समजताच संपूर्ण शिरसमणी गावासह पंचक्रोशीतील नागरिकांमध्ये शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. कै. दीपक वाघ हे श्री उत्तम भावडू वाघ यांचे सुपुत्र व किशोर उत्तम वाघ यांचे लहान बंधू होते. आपल्या कर्तव्यनिष्ठ, शांत आणि मनमिळाऊ स्वभावामुळे त्यांनी परिसरात एक वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या अचानक जाण्याने कुटुंबावर तसेच गावावर दुःखाचा मोठा आघात झाला आहे. त्यांचा अंत्यसंस्कार विधी दिनांक ४ मे २०२६ रोजी दुपारी ११:३० वाजता शिरसमणी येथील अमरधाम येथे अत्यंत शोकाकुल वातावरणात पार पडला. यावेळी SRPF जवान तसेच कळवण पोलीस दलातील पोलीस निरीक्षक व कर्मचारी उपस्थित राहुन



त्यांना सन्मानपूर्वक अखेरची मानवंदना देण्यात आली तर . पंचक्रोशीतील नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून अश्रुपूर्ण वातावरणात अंतिम निरोप दिला त्यांच्या जाण्याने अनेकांनी दुःख व्यक्त केले. त्यांच्या पश्चात आई-वडील, भाऊ, पत्नी व एक लहान मुलगा असा परिवार आहे. समाजसेवा आणि कर्तव्य बजावत असताना आयुष्य अर्पण करणाऱ्या या जवानाच्या निधनाने परिसरात दुःखाची लाट उसळली असून, त्यांच्या आठवणी कायम सर्वांच्या मनात जिवंत राहतील. भावपूर्ण श्रद्धांजली!

# २६ वर्षीय महिला डॉक्टरची आत्महत्या

### पारनेरमध्ये धक्कादायक घटना : माहेरहून १२ लाख रुपये आणण्याच्या छळाला कंटाळून टोकाचे पाऊल

### सासरच्यांवर गुन्हा दाखल, मात्र आरोपींना अद्याप अटक नाही!

पारनेर : (स. गांवकरी)

लग्नानंतर माहेरहून १२ लाख रुपयांची मागणी, शिवीगाळ, दमदाटी आणि सततच्या मानसिक छळाला कंटाळून एका २६ वर्षीय महिला डॉक्टरने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना पारनेर तालुक्यातील गोरेगाव येथे घडली आहे. डॉ. गौरी सुनिल चौरे (वय २६, रा. काळपट्टी वस्ती, गोरेगाव, ता. पारनेर) असे या दुर्दैवी तरुणीचे नाव आहे . याप्रकरणी तिच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून पती, सासू आणि सासऱ्यांविरुद्ध आत्महत्येला प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, गुन्हा दाखल होऊनही आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नाही.



तक्रारदार सुनिल जबाजी चौरे (वय ५४, रा. गोरेगाव) यांनी दिलेल्या माहितीनुसार, गौरीचे लग्न २३ नोव्हेंबर २०२४ रोजी अमित बाबासाहेब दळवी (रा. तपोवन रोड, अहिल्यानगर; सध्या कामोठा, मुंबई) यांच्याशी मोठ्या थाटामाटात झाले होते. लग्नानंतर सुरुवातीचे तीन महिने अहिल्यानगर येथे सर्व काही सुरळीत होते. त्यानंतर हे जोडपे मुंबईतील कामोठा येथे वास्तव्यास गेले. मुंबईला गेल्यानंतर पती अमित दळवी याने, फ्लॅट घेण्यासाठी माहेरहून १२ लाख रुपये आण अशी मागणी करत गौरीला त्रास देण्यास सुरुवात केली. सासू आणि सासऱ्यांनीही तुम्ही लग्न साधे केले, भाड्याच्या घरात राहण्यापेक्षा पैसे आणा असे म्हणत तिला वारंवार टोमणे मारले. गौरीने खाजगी रुग्णालयात नोकरी सुरू केली होती, परंतु तिचा पगारही सासरच्यांनी काढून घेतला. तसेच, फेब्रुवारी २०२५ मध्ये तिच्या लग्नातील सोन्याचे दागिनेही बळकावून घेतल्याचे तिने आपल्या आई-वडिलांना फोनवरून सांगितले होते. पती अमित हा दारूच्या आहारी जाऊन पैसे मागण्यासाठी तिला मारहाण करत असे. गौरीने वेळोवेळी आपल्या आई-वडिलांना आणि काकांना याबाबत माहिती दिली होती. ऑक्टोबर २०२५ मध्ये गौरीच्या पुतणीच्या लग्नात आलेले सासरचे लोक म्हणाले, "तुम्ही हे लग्न कसे मोठे केले? आमच्या वेळी भिक लागली होती का?" यावर गौरीने आक्षेप घेतला असता, सर्वांसमोर तिचा अपमान करण्यात आला. फेब्रुवारी २०२६ मध्ये गौरीने आपल्या नवऱ्याचे इतर मुलींशी असलेले अनैतिक संबंध असल्याचे घरच्यांना सांगितले. याबाबत तिची आई मुंबईला जाऊन वाद मिटवून आली, तरीही छळ थांबला नाही.

सविस्तर घटनेनुसार, २७ एप्रिल २०२६ रोजी गौरी, तिचा पती अमित आणि सासरे बाबासाहेब हे गोरेगाव येथे आले. त्यावेळी अमितने, "तू इथेच थांब, मी पप्पांना नगरला सोडून तुला घ्यायला येतो," असे सांगून तो निघून गेला. त्यानंतर तो परत आला नाही आणि कोणाचेही फोन उचलले गेले नाहीत. २८ एप्रिल २०२६ रोजी गौरी व तिची आई अहिल्यानगर आणि मुंबई येथे गेली, परंतु दोन्ही ठिकाणी घराला कुलूप होते. त्यानंतर ०२ मे २०२६ रोजी गौरी घरात एकटी असताना सकाळी साडेसात ते साडेआठच्या दरम्यान तिने शिलिंगच्या हुकाला दोरीच्या साहाय्याने गळफास घेतला. आई शेतातून परत आल्यावर ही घटना उघडकीस आली.

## थोडक्यात पण महत्वाचे



### निंबावली-गुरावली माध्यमिक शाळेला शेठ नानजीभाई ठक्कर यांची भेट

■ सर्वतोपरी सहकार्याचे आश्वासन!

निंबावली-गुरावली, ता. कल्याण (स. गांवकरी) : दादोजी कोंडदेव शिक्षण प्रसारक संस्थेचे प्रमुख शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणेवाला यांनी दिनांक १ मे २०२६ रोजी कल्याण तालुक्यातील निंबावली-गुरावली येथील माध्यमिक शाळेला भेट देत शाळेच्या विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. गावातील ही शाळा अनेक वर्षांपासून शैक्षणिक कार्य करत असून आजपर्यंत केवळ सुमारे ४० टक्के अनुदान मिळाल्याने शाळेला विविध अडचणींचा सामना करावा लागत असल्याची माहिती शाळा प्रशासनाने यावेळी दिली. शाळेच्या दैनंदिन कामकाजासाठी तसेच अद्ययावत शैक्षणिक सुविधा उपलब्ध करण्यासाठी अधिक मदतीची आवश्यकता असल्याचेही नमूद करण्यात आले. या प्रसंगी शाळेच्या वतीने शेठ नानजीभाई ठक्कर यांचा शाल, फळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, “शाळेसाठी जे काही शक्य असेल ते सर्व सहकार्य N.K.T. मार्फत पुरवले जाईल. शाळेचा ९२ टक्के निकाल हा कौतुकास्पद असून पुढील काळात १०० टक्के निकालासाठी प्रयत्न सुरू ठेवावेत.” गावात शाळा चालविणे ही मोठी जबाबदारी असल्याचे सांगत त्यांनी शिक्षकवर्गाचे अभिनंदन केले. शाळेच्या मुख्याध्यापकांनीही शिक्षक, अभ्यासक्रम व संसाधनांवर अधिक लक्ष केंद्रित करून विद्यार्थ्यांना प्रेरित करत १०० टक्के निकाल मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवणार असल्याचे सांगितले. या भेटीमुळे शाळा प्रशासन व ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले.

### ७ मे रोजी भव्य विराट हिंदू संमेलन; हिंदू एकता, संस्कृती संरक्षणाचा संदेश

अकोले (स. गांवकरी) : हिंदू समाजात एकता, संघटन आणि राष्ट्रीयत्वाची भावना दृढ करण्याच्या उद्देशाने अकोले येथे गुरुवार दि. ७ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता भव्य विराट हिंदू संमेलन आयोजित करण्यात आले आहे. हे संमेलन अगस्ती विद्यालय, अकोले येथे पार पडणार असून मोठ्या प्रमाणावर हिंदू समाजबांधवांनी कुटुंबासह उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. जात, पंथ, भाषा यांचे भेद विसरून हिंदू धर्म, परंपरा, संस्कृती आणि मूल्यांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी तसेच देशभक्तीची भावना जागृत करण्याच्या हेतूने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. अकोले शहरासह धुमाळवाडी, नवलेवाडी, धामणगाव आवारी, सुगाव, वाशेरे, परखतपूर, मनोहरपूर, कळस, गर्दणी, कुंभेफळ, रेडे, खानापूर, टाकळी, ढोकी आणि उंचखडक येथील हिंदू समाज संमेलन समित्यांनी संयुक्तरित्या या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या संमेलनास कणेरी मठाचे मठाधिपती अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामी तसेच अखिल भारतीय सह संयोजक बजरंग दल विवेक दिनकर कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाआधी सायंकाळी ५ वाजता महात्मा फुले चौक ते अगस्ती विद्यालय, अकोले दरम्यान भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमास हिंदू समाजातील सर्व बांधव आणि भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन सकल हिंदू समाज संमेलन समिती, अकोले यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### बंद पडलेले घड्याळ शहराच्या विकासासाठी अपशकून ठरणार का ? संजय छल्लारे

श्रीरामपूर (स. गांवकरी) : शहरातील नेहरु भाजी मार्केट येथील टॉवरवरील घड्याळ दुरुस्तीसाठी काल सोमवार दि. ४ मे २०२६ रोजी भाजपचे संजय छल्लारे यांच्या नेतृत्वात श्रीरामपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांच्या कार्यालयात आंदोलन करण्यात आले. यावेळी नगरसेवक आशिष धनवटे, दिपक चव्हाण, रवी पाटील, श्रीनिवास बिहाणी, सिद्धार्थ फंड, मनोज लबडे, रवींद्र गुलाटी, राजेश अलघ आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना संजय छल्लारे म्हणाले, श्रीरामपूर शहरात पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्यामूळे छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभारण्यात आले.परंतू त्यांच्या स्मारकासमोरच असलेले हे घड्याळ कित्येक दिवसांपासून बंद पडलेले आहे.

## बँकेचे शाखा व्यवस्थापक ते वेल्थ बिल्डर वसंत कुटे यांचा यशस्वी प्रवास

पुणे : (स. गांवकरी)



बदलत्या आर्थिक सेवा क्षेत्रात यशस्वी प्रवासासाठी अनुभव, शिस्त आणि एका भक्कम संस्थात्मक प्लॅटफॉर्मची जोड आवश्यक असते. उद्योगातील अनुभव आणि योग्य ‘इकोसिस्टीम’च्या मदतीने एक शाश्वत आणि विस्तारक्षम आर्थिक सेवा व्यवसाय कसा उभारता येतो, याचे उत्तम उदाहरण म्हणजे ‘एनजे वेल्थ’चे पार्टनर वसंत कुटे यांचा प्रवास होय. म्युच्युअल फंड वितरक म्हणून काम सुरू करण्यापूर्वी वसंत कुटे यांनी कॉसमॉस बँक आणि सारस्वत बँक आदी नामांकित बँकांमध्ये अनेक वर्षे सेवा दिली. शाखा व्यवस्थापक आणि वरिष्ठ व्यवस्थापक म्हणून काम करताना त्यांना आर्थिक उत्पादने, ग्राहक संवाद आणि शिस्तबद्ध संपत्ती संचय याचे सखोल ज्ञान मिळाले. याच कौशल्यांनी त्यांच्या उद्योजकीय प्रवासाचा पाया रचला. जानेवारी २०१८ मध्ये कुटे यांनी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. आपली बँकिंग क्षेत्रातील कारकिर्द सोडून त्यांनी स्वतंत्र व्यवसाय उभारण्यासाठी ‘एनजे वेल्थ’शी भागीदारी केली. हा निर्णय त्यांच्या आयुष्यातील टर्निंग पॉइंट ठरला. आज ते १४० कोटी रुपयांच्या मालमत्तेचे (एयूएम) व्यवस्थापन करीत असून, देशभरातील दोन हजारांहून अधिक ग्राहकांना सेवा देत आहेत. त्यांचे बहुतांश ग्राहक महाराष्ट्रातील (पुणे, मुंबई, नाशिक, कोल्हापूर, नंदुरबार आणि नागपूर) असले, तरी कोलकाता, चेन्नई आणि दिल्ली यांसारख्या शहरांतही त्यांचे जाळे विस्तारलेले आहे. विशेष म्हणजे, त्यांचे सुमारे ८० टक्के ग्राहक त्यांना कधीही प्रत्यक्ष भेटलेले नाहीत. हे डिजिटल माध्यमांच्या वाढत्या प्रभावाचे निदर्शक आहे. गुंतवणूकदार शिक्षण हा त्यांच्या कार्यपद्धतीचा मुख्य भाग आहे. नियमित सेमिनार आणि ऑनलाइन सत्रांच्या माध्यमातून ते महागाई, आपत्कालीन निधी आणि दीर्घकालीन शिस्तबद्ध गुंतवणुकीसारख्या संकल्पनांवर भर देतात. ‘एनजे वेल्थ’चे तंत्रज्ञान, संशोधन आणि भागीदार यंत्रणेच्या बळावर, वसंत कुटे यांचा प्रवास हे सिद्ध करतो, की योग्य प्लॅटफॉर्म मिळाल्यास अनुभवाचे रूपांतर शाश्वत प्रगतीत होऊ शकते.

# नेवासा येथे निशुल्क वारकरी बालसंस्कार शिबिराचे आयोजन

## महंत देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांची माहिती

नेवासा : (स. गांवकरी)

महावैष्णव श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांची कर्मभूमी व ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे रचनस्थान असलेल्या तीर्थक्षेत्र नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वतीने गुरुवार दि.७ मे पासून पंधरा दिवशीय निशुल्क वारकरी बालसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख मार्गदर्शक व विश्वस्त हभप महंत श्री देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांनी दिली.

सर्व संत महंत यांच्या कृपाशिर्वादाने संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानच्या वतीने वारकरी बालसंस्कार शिबिर हे गुरुवार दि.०७ मे २०२६ ते गुरुवार दि.२१ मे २०२६ या पंधरा दिवसाच्या कालावधीत चालणार आहे.वय वर्षे १० ते १६ वयोगटातील मुलांसाठी हे शिबिर असून बाल मनावर चांगले संस्कार व्हावेत आजचा बालक उद्याचा यशस्वी सुसंस्कृत पालक बनावा हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन पंधरा दिवशीय बालसंस्कार शिबीर घेण्याचे आयोजन संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानच्या वतीने करण्यात आले असल्याचे महंत श्री देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांनी सांगितले. वारकरी बालसंस्कार शिबिरामध्ये मुलांना काकडा भजन ,विष्णूसहस्रनाम,योग,प्राणायम,ज्ञानेश्वरी पाठांतर हरिपाठ,अभंग,थोर संतांची चरित्र,संस्कृत श्लोक,संस्कार प्रवचन शिकवण्यात येणार आहे. यासाठी प.पू.श्री भगवानजी महाराज जंगले (शास्त्री),गायनाचार्य ज्ञानदेव माऊली शिंदे,रामायणाचार्य ज्ञानेश्वर माऊली नंदकिशोर महाराज खरात,गहिनीनाथ महाराज आढाव,कृष्णा महाराज हारदे,आदिनाथ महाराज भोगे,सचिन महाराज पवार,राम महाराज चोपडे,सुगम महाराज शिंदे,ओंकार महाराज काशिद, गणेश महाराज गायकवाड,सागर महाराज टेमक, राम महाराज खरवंडीकर,नवनाथ महाराज आगळे,योगेश महाराज होन,रामेश्वर महाराज कंठाळे सर,गणेश महाराज आरगडे,भास्कर महाराज मुळक, अविनाश महाराज लोखंडे,भगवान महाराज डिके,श्रीहरी महाराज वाकचौरे हे शिक्षकाची भूमिका बजावून बाल वारकऱ्यांना प्रशिक्षण देणार आहे यासाठी संस्थेचे आजी-माजी विद्यार्थी ही सहभागी होऊन मार्गदर्शन करणार आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे विश्वस्त व मार्गदर्शक वेदांताचार्य देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या नियोजनात व मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या शिबिरात श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे अध्यक्ष व विश्वस्त मंडळाच्या वतीने योग्य नियोजन करण्यात आले असून सदर शिबिरात १० ते १६ या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश देण्यात येणार आहे, बाहेरगावच्या मुलांची राहण्याची मोफत सोय करण्यात आली असून त्यांनी अंथरुण-पांघरुन तसेच ताट-तांब्या बरोबर आणायचे आहे.सर्व मुलांना पांढरा गणवेश बंधनकारक रहाणार आहे.शिबीरामध्ये येतांना जर विद्यार्थ्यांना पखवाज, हार्मोनियम हे वाद्य शिकायचे असल्यास ज्याचे त्याने ते वाद्य बरोबर आणणे आवश्यक असल्याचे शिबिर संयोजक वेदांताचार्य हभप श्री देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांनी सांगितले. उन्हाळयाच्या सुट्टीच्या निमित्ताने संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वतीने आयोजित निशुल्क वारकरी बाल संस्कार शिबिरामध्ये पालकांनी आपल्या मुलांना सहभागी करावे त्यासाठी त्यांनी देवस्थानशी संपर्क साधून नावनोंदणी करावी असे आवाहन संस्थेचे मार्गदर्शक विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के शास्त्री, विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग अभंग व सर्व विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.








## घरफोडी करणारा ५ लाख ८१ हजारांचा मुद्देमालासह अटकेत

ठाणे : (स. गांवकरी)

मुंब्रा परिसरात घरफोडी करून लाखोंचा मुद्देमाल चोरणाऱ्या एका आरोपीला मुंब्रा पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. अल्ताफ शनावर शेख (वय १९, रा. मुंब्रा) असे त्याचे नाव आहे. या कारवाईत पोलिसांनी ३ तोळे सोन्याचे दागिने आणि १ लाख ९६ हजारांची रोकड असा एकूण ५ लाख ८१ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या कामगिरीमुळे मुंब्रा परिसरातील एका मोठ्या गुन्ह्याची उकल झाली आहे. २६ एप्रिल रोजी मोहम्मद सोदू इस्लाम खान (वय २९, रा. मुंब्रा) हे आपल्या कुटुंबासह कामानिमित्त बाहेर गेले होते. यावेळी अज्ञाताने त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि ३ तोळे सोन्याचे दागिने व रोकड असा एकूण ५ लाख ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला होता. याप्रकरणी मुंब्रा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. मुंब्रा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/विनायक माने यांच्या पथकाने तपासाची सूत्रे हाती घेतली. परिसरातील १०० ते १५० सीसीटीव्हीची तपासणी आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीस अटक केली आहे.

## २१ जोडप्यांचा भव्य सामूहिक विवाह सोहळा संपन्न



वसमत : (स. गांवकरी)

वाढत्या महागाईच्या काळात सर्वसामान्य कुटुंबांवर लग्नाचा वाढता आर्थिक बोजा लक्षात घेऊन, वसमतमध्ये सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण पाहायला मिळाले. ‘श्री छत्रपती शिवाजी महाराज सेवा प्रतिष्ठान’ यांच्या वतीने आयोजित २१ वधू-वरांचा भव्य सामूहिक विवाह सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि मंगलमय वातावरणात पार पडला. या सोहळ्याचे प्रमुख आयोजक डॉ. अजय जयप्रकाश मुंदडा यांनी घेतलेला पुढाकार सध्या संपूर्ण तालुक्यात चर्चेचा आणि कौतुकाचा विषय ठरला आहे. अवाजवी खर्चाला आळा घालून सामान्य कुटुंबांतील युवक-युवतींचे संसार सुखाने उभे राहावेत, या उदात्त हेतूने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

वैद्यकीय सेवेसोबतच सामाजिक उत्तरदायित्व जपत डॉ. मुंदडा यांनी उचललेले हे पाऊल विशेष उल्लेखनीय ठरले. या सोहळ्यास माजी सहकार मंत्री जयप्रकाश मुंदडा यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर, राजकीय नेते, व्यापारी, शेतकरी, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी आयोजकांचे मनापासून कौतुक करत, हा केवळ विवाह सोहळा नसून समाजजागृतीची चळवळ आहे, अशा भावना व्यक्त केल्या. सर्व २१ जोडप्यांचे विवाह अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. महागाईच्या पार्श्वभूमीवर पालकांवरील आर्थिक ताण मोठ्या प्रमाणात कमी झाला. हजारो नागरिकांनी उपस्थित राहून नवदांपत्यांना शुभाशिर्वाद दिले. यावेळी बोलताना डॉ. अजय मुंदडा म्हणाले,सामान्य माणसाच्या सुख-दुःखात सहभागी होणे हेच आमचे कर्तव्य आहे.

शेतकरी व कष्टकरी बांधवांवरील आर्थिक भार कमी व्हावा, या उद्देशानेच हा उपक्रम राबवला. या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत असून, नवदांपत्यांना उज्ज्वल आणि सुखी भविष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# वरसु आई मातेच्या यात्रेला लाखो भाविकांची गर्दी

## वरसु आई यात्रा सोहळ्यात डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन!

■ तीन दिवसीय यात्रा भक्ती, परंपरा आणि जल्लोषात संपन्न!

■ तरुणांच्या शिस्तबद्ध नियोजनामुळे यात्रेला राज्यस्तरीय स्वरूप; चितळवेढे गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले!


■ वरसु आई मातेच्या दरबारात नव्या भव्य सिंहासनाची शोभा

■ श्री. गणेश भानुदास आरोटे यांचे भक्तिपूर्ण योगदान!















अकोले : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील निसर्गरम्य प्रवरा नदीच्या कुशीत वसलेले, वारकरी परंपरा, धार्मिक संस्कार आणि ग्रामदैवतावरील अखंड श्रद्धा जपणारे चितळवेढे गाव यंदाच्या ग्रामदेवी वरसु आई मातेच्या भव्य यात्रेनिमित्त अक्षरशः भक्तिरसात न्हाऊन निघाले. ग्रामदेवीच्या तीन दिवसीय यात्रा महोत्सवाला यंदा विक्रमी प्रतिसाद मिळाला असून राज्याच्या कानाकोपऱ्यातून तसेच नोकरी, व्यवसाय, शिक्षण आणि उदरनिर्वाहासाठी बाहेरगावी स्थायिक झालेल्या चितळवेढेकरांनी यात्रेसाठी खास गावी हजेरी लावली. परिणामी संपूर्ण गावात उत्सवाचे, भक्तीचे आणि आनंदाचे अनोखे वातावरण निर्माण झाले.

यंदाच्या यात्रेला लाखो भाविकांनी उपस्थित राहून ग्रामदेवी वरसु आई मातेच्या दर्शनाचा लाभ घेतला, अशी माहिती यात्रा समितीकडून देण्यात आली.

यात्रेचे प्रमुख आकर्षण ठरले ते ग्रामदेवीसाठी अर्पण करण्यात आलेले नवीन आकर्षक सिंहासन. गावातील श्रद्धावान भक्त श्री. गणेश भानुदास आरोटे यांनी ग्रामदेवीसाठी देखणे आणि कलात्मक सिंहासन अर्पण केले. या सिंहासनाची दि. ३० मार्च २०२६ रोजी भव्य मिरवणूक मोठ्या जल्लोषात काढण्यात आली होती. ढोल-ताशे, टाळ-मृदंग, भगवे ध्वज, फटाक्यांची आतषबाजी आणि जयघोषाच्या गजरात निघालेल्या या मिरवणुकीने संपूर्ण पंचक्रोशीचे लक्ष वेधून घेतले. पंचक्रोशीतील शेकडो भक्त आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत ग्रामदेवीवरील श्रद्धेचा प्रत्यय दिला.

यात्रेच्या पहिल्या दिवशी दि. १ मे रोजी पहाटेपासूनच मंदिर परिसरात धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल सुरू झाली. ग्रामदेवीचा पारंपरिक पद्धतीने महाभिषेक, होम-हवन, विशेष पूजाविधी करण्यात आले. यानंतर पारंपरिक जागरण-गोंधळ कार्यक्रमाने वातावरण भक्तिमय झाले. दुपारनंतर काठीची भव्य मिरवणूक गावातून काढण्यात आली. पारंपरिक वाद्यांच्या गजरात निघालेल्या या मिरवणुकीत महिलांनी फुगड्या, तर युवकांनी लेझीम, ढोल आणि भगव्या पताकांसह उत्साहपूर्ण सहभाग घेतला. सायंकाळी ग्रामदेवीची महाआरती करण्यात आली आणि त्यानंतर महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कलाकारांच्या उपस्थितीत भारुडाचा भव्य सांस्कृतिक कार्यक्रम रंगला. भारुडाच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन आणि भक्ती यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी दि. २ मे रोजी महाआरतीनंतर ग्रामस्थ व भाविकांसाठी भव्य ऑर्केस्ट्रा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटनाचा मान महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांना देण्यात आला. त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमात विविध गायक-कलाकारांनी सादर केलेल्या सुमधुर गीतांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले, या ठिकाणी लोखंडे निर्मित आर्केस्ट्रा या कलाकारांनी प्रेक्षकांची मने जिंकली व हिंदी मराठी लावण्या व गाण्याने उपस्थित मंत्रमुग्ध झाले!

ग्रामदेवीसाठी तयार करण्यात आलेल्या सिंहासनाची कलात्मक निर्मिती करणारे राजूर येथील सुप्रसिद्ध कलाकार श्री. संजय सूर्यवंशी यांचा यावेळी ग्रामस्थांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. तसेच सिंहासन दाते श्री. गणेश भानुदास आरोटे व त्यांच्या कुटुंबीयांचाही मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या वेळी ग्रामस्थांनी त्यांच्या उदात्त योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या भव्य यात्रेस गावचे सरपंच नामदेव पथवे, उपसरपंच नवनाथ गोविंद आरोटे, पोलीस पाटील किसन आरोटे, किरण भागवत, सुनील मोहटे, यशवंत आरोटे, मुंबई पोलीस दलातील अधिकारी प्रदीप आरोटे, पोलीस कॉन्स्टेबल अमोल आरोटे. नारायण गवराज आरोटे चितळे विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन लक्ष्मण आरोटे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, अधिकारी आणि पंचक्रोशीतील हजारो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात्रा यशस्वी करण्यासाठी यात्रा संयोजन समिती शेखर आरोटे व कार्याध्यक्ष नारायण तान्हाजी आरोटे ..राहुल जाधव. उमेश आरोटे शांताराम सोनवणे निलेश आरोटे योगेश संपत आरोटे अजिंक्य आरोटे साईला आरोटे .संजय आरोटे. मदन भागवत धनराज आरोटे . मनोज आरोटे राज आरोटे . किंग मेकर बाळासाहेब रामनाथ आरोटे. यांच्या नेतृत्वाखाली युवकांनी केलेले नियोजन विशेष कौतुकास्पद ठरले. वाहतूक व्यवस्था, पार्किंग, दर्शनरांगा, स्वच्छता, सुरक्षा, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा, सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन, मंदिर परिसराची सजावट, महाप्रसाद व्यवस्था अशा सर्व बाबींचे अत्यंत सुयोग्य व्यवस्थापन करण्यात आले. विशेष म्हणजे गावातील तरुणांनी यात्रेच्या सर्व कामांत खांद्याला खांदा लावून सहभाग घेत, गावाच्या एकोप्याचा आदर्श निर्माण केला. यात्रेच्या निमित्ताने गावातील प्रत्येक घरातून ग्रामदेवीसाठी गोड पोळीचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. ही पारंपरिक प्रथा आजही मोठ्या भक्तिभावाने जपली जात असल्याचे चित्र पाहायला मिळाले. महिलांनी पारंपरिक .....वेशभूषेत सहभागी होत धार्मिक वातावरण अधिक मंगलमय केले.

गावातील ज्येष्ठ ग्रामस्थांच्या मते, “यंदाची यात्रा ही आतापर्यंतच्या सर्व यात्रांपेक्षा अधिक भव्य, शिस्तबद्ध आणि ऐतिहासिक ठरली असून गावाच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक ऐक्याचे हे जिवंत उदाहरण आहे.” भक्ती, श्रद्धा, संस्कृती, परंपरा, सामाजिक एकोपा आणि आधुनिक नियोजन यांचा अद्वितीय संगम घडवणारा चितळवेढे ग्रामदेवी वरसु आई मातेचा यात्रा महोत्सव यंदा अत्यंत दिमाखात पार पडला असून हा सोहळा चितळवेढे ग्रामस्थांसह संपूर्ण पंचक्रोशीतील भाविकांच्या स्मरणात दीर्घकाळ राहणार आहे. “आई वरसु मातेच्या जयघोषाने दुमदुमला चितळवेढे परिसर; भक्तीचा महासागर उसळला!”

# तापमानाचा पारा वाढला : तापीतील मासेमारी धोक्यात

रावेर : (स. गांवकरी)

जळगाव जिल्ह्यातील महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या तापी , पुर्णा नद्यांच्या संगमालगत , व हतनुर धरण क्षेत्रात तपमानाचा पारा वाढुन ४६ पर्यंत गेल्याने , पारंपारिक मासेमारी व्यवसाय धोक्यात येऊन , मासेमारी शिकार्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. वडीलोपार्जित व्यवसराय करणाऱ्या रावेर व मुक्ताई तालुक्यातील तापी किनार पट्टीवर हा व्यवसाय मोठ्या प्रमाणार केला जातो. यातील सर्वच शिकारी प्रकल्प बाधीत असून , पुर्ण शेतशिवार व त्यांच्या शेत जमिनी जलश संचयाखाली गेलेले आहेत.




उदरनिर्वासाठी या भागातील हे सर्वच आदिवाशी लोक हाव्यवसाय करतात. त्यात प्रामुख्याने, भिल्ल , कोळी, बेलदार , कहार , भोई , आणि इतर जाती जमातीतील लोक आपल्या परिने छोटया छोट्या जाळयांद्वारे हा व्यवसाय करतात . परंतु गेल्या महिना भरा पासून तपमानाचा पारा वाढल्याने , यावर वाईट परिणाम झाला आसून , मासे मिळणे कठीण झाले आहे. नदीतील पाणी दुपारी गरम होत असल्याने , त्यामुळे तापी नदीतील मासोळी हाळ नावाच्या वनस्पतीचा आधार घेऊन , त्यात जाऊन , राहते व पाण्याच्या बाहेर येतच नाही असे मासेमारी शिकऱ्यांनी गांवकरीशी प्रतिशी बोलतांना सांगितले . पुढे त्यांनी सांगितले अत्यांत विषारी असणारी ही वनस्पती मानवाला खुपच त्रास दायक आहे . त्यात कुणी प्रवेश केल्यास संपुर्ण अंगाला खाज सुटते व शरिरावर त्याच्या जखमा होतात. बऱ्याच वेळा यात अनेकांचा यात बळीही गेल्याचे मासेमारी शिकाऱ्यांनी सांगितले . सदरची वनस्पती ही धरण क्षेत्राच्या जल संचायातच मोठ्या प्रमाणार होते . व मासेमारीवर त्याचा वाईट परिणाम होतो. हतनुर धरण हे जळगाव जिल्हयातील महत्वाचे व प्रमुख धरण मानले जाते . त्याच्या जलाशयातील मासे हे सर्वच पारंपारिक असून , त्यात कोणत्याही संकरीत जातीचे बियाणे सोडले जात नाही . म्हणून यातील मासोळीला सर्वत्र मागणी आहे.

त्यामुळे या भागातील स्थानिकांना बऱ्यापैकी रोजगार असून , हे प्रकल्प बाधीत आहेत. परंतु गेल्या महीणा भरापासून , तयमानाचा पारा ४६ पर्यंत गेल्याने , या व्यवसायावर वाईट परिणाम झाला आहे .




ठाणे : ठाण्यात आज दुपारी १:४७ वाजताच्या सुमारास नितीन ब्रिज जवळ, टाटा मोटर शोरूम समोर, नितीन कंपनी, नाशिक-मुंबई रोड, ठाणे (प.). या ठिकाणी नाशिक कडून ठाण्याकडे येणाऱ्या रोडवरती नितीन कंपनी ब्रिज उतरताना एका पाठोपाठ एका वाहनांनी पाठीमागून धडक दिल्यामुळे एकूण-०६ चारचाकी वाहनांचा अपघात झाला होता. सदर घटनास्थळी वाहतूक पोलीस अधिकारी व कर्मचारी, नौपाडा पोलीस अधिकारी व कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी ०१-पिकअप वाहनासह, अग्रिशमन दलाचे जवान ०१-इमर्जन्सी वाहनासह व ०१-रेस्क्यू वाहनासह, ठाणे महानगरपालिका आरोग्य विभागाचे कर्मचारी ०१-रुग्णवाहिकेसह उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...



### कुकडी पाटबंधारे धरणातील पाण्याची टक्केवारी २०.२६

कुकडी (स. गांवकरी) : कुकडी पाटबंधारे विभागातील धरणातील पाण्याची टक्केवारी २०.२६ व मागील वर्षाची धरणातील पाण्याची टक्केवारी ११.२८ आहे. कुकडी पाटबंधारे विभागातील सर्व धरणातील पाण्याचा उपयुक्त साठा टक्केवारी ६०१३ .८१ व मागील वर्षाचा धरणातील पाण्याचा उपयुक्त साठा टक्केवारी ३३४६. ८२ आहे. चालू वर्षी उष्णतेचे प्रमाण जास्त असल्यामुळे शेतीला व जनावरांना पाणी जास्त लागत आहे . माणिकडोह , पिंपळगाव जोगे , डिंभे व इतर धरणातील पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना व नागरिकांना पाण्यासाठी दुर दुर जावे लागत आहे चालू वर्षी गंधाचा कार्यक्रम, शुभविवाह , श्री सत्यनारायणाची महापूजा, वास्तुशांती, घरभरणी व इतर सांस्कृतिक धार्मिक कार्यक्रम ठिकाणी पाण्याची बिसलरी , फिल्टर जार , बाटला नागरिकांना या माध्यमातून पिण्याचे पाणी देण्यात देण्यात आहे . या पाण्याची तपासणी न केल्यामुळे नागरिकांना आरोग्याचा धोका पत्करावा लागत आहे . याबाबत तहसीलदार , पंचायत समिती गटविकास अधिकारी व संबंधित प्रशासन अधिकारी गप्प ? त्यामुळे नागरिकांना धोका पत्करावा लागत आहे . अशी चर्चा तालुक्यात सुरू आहे . कुकडी पाटबंधारे विभागातील सर्व धरण क्षेत्रामधून नदीपात्रात व सांडव्यामधून शेतीला पाणी सोडण्यात आले नाही . त्यामुळे भटकती जनावरे , पाळीव जनावरे व नदीकाठच्या विहिरींना पाण्याचा फटका बसला आहे . यामुळे नदीकाठच्या शेतकऱ्यांना शेतीला पाण्याचा फटका बसला आहे.

### "मानधन रखडले, न्याय नाही" - २१ मे रोजी जुन्नर तहसीलवर गजर आंदोलन

आळेफाटा (स. गांवकरी) :आळेफाटा,ता. जुन्नर:- पुणे जिल्ह्यातील लोककलावंतांच्या मानधन योजना गेल्या वर्षभरापासून रखडल्याच्या निषेधार्थ लोककलावंत सांस्कृतिक विचार मंच महाराष्ट्र राज्यच्या वतीने २१ मे रोजी जुन्नर तहसील कार्यालयावर भव्य गजर आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात जिल्ह्यातील अडीच हजारांहून अधिक ग्रामीण लोककलावंत आपले कला साहित्य घेऊन सहभागी होणार आहेत. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गवनेरजी सरोदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी २०२४ चा मानधन प्रस्ताव मंजूर करून पुणे जिल्हा परिषदेकडे पाठवला. मात्र, प्रस्तावाचे व्हेरिफिकेशन न करता मानधन मंजूर कलावंतांची यादी जाहीर करण्यात आली नाही. कलेक्टरमार्फत जिल्हा परिषदेकडे गठीत होणारी मानधन समिती अद्याप कार्यरत झालेली नाही. त्यामुळे राजश्री शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजनेचा लाभ पुणे जिल्ह्यातील अनेक कलावंतांना मिळालेला नाही.२०२४ च्या प्रस्तावासाठी अनेक कलावंतांनी ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण केली असली तरी पंचायत समितीकडून कोणताही संपर्क झालेला नाही. राज्यातील इतर जिल्ह्यांत २०२४ चे मानधन सुरू झाले असताना पुण्यात मात्र चौकशी केल्यावर अधिकारी समाधानकारक उत्तर देत नाहीत.

### मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या स्पर्धेत भिवंडीचा झेंडा; अद्वैत जाधव 'सामनावीर'

भिवंडी (स. गांवकरी) : मुंबईतील प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या मुंबई क्रिकेट असोसिएशन आयोजित १२ वर्षांखालील 'टॅलेंट हंट' लेदरबॉल क्रिकेट स्पर्धेत भिवंडी तालुक्यातील समतानगर, पडघा येथील अद्वैत अमोल जाधव याने उत्कृष्ट कामगिरी करत अंतिम सामन्यात 'सामनावीर' (Man of the Match) पुरस्कार पटकावला आहे. कांदिवली येथील सचिन तेंडुलकर जिमखाना मैदानावर ही स्पर्धा पार पडली. अद्वैत जाधवने संपूर्ण स्पर्धेत प्रभावी अष्टपैलू कामगिरी करत तीन सामन्यांत एकूण ९ फलंदाज बाद केले आणि १२० धावा जमविल्या. विशेषतः अंतिम सामन्यात त्याने ३ विकेट्स घेत ६७ धावांची सामना-विजयी खेळी साकारत आपल्या संघाला दणदणीत विजय मिळवून दिला. त्याच्या या भक्कम प्रदर्शनामुळे त्याला 'सामनावीर' पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी त्याला मेडल तसेच वानखेडे स्टेडियम येथे होणाऱ्या आयपीएल सामन्याचे तिकीट देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेसाठी मुंबई शहर व ग्रामीण भागातून तब्बल ५००० खेळाडूंची निवड चाचणी घेण्यात आली होती. पहिल्या फेरीत २३०, तर दुसऱ्या फेरीत १२० खेळाडूंची निवड करण्यात आली. त्यातून ८ संघांची निर्मिती करण्यात आली होती. या स्पर्धेत अद्वैतची 'ई' संघात निवड झाली होती. लीग सामन्यांमध्येही त्याने सातत्यपूर्ण कामगिरी करत आपले वर्चस्व सिद्ध केले. ग्रामीण भागातून आलेल्या अद्वैत जाधवने आपल्या खेळाच्या जोरावर शहरी स्पर्धेत ठसा उमटवत भिवंडी तालुक्याचे नाव उज्वल केले आहे. त्याच्या या यशामागे भिवंडी तालुका क्रिकेट असोसिएशन व मुंबई क्रिकेट असोसिएशनशी संलग्न प्रशिक्षक हुसेन सरगुरू, उमरहुसेन सरगुरू, अजय जयस्वाल आणि कृष्णा केशरवाणी यांचे मार्गदर्शन लाभले. अद्वैतच्या या उल्लेखनीय यशाबद्दल टी. ए. पाटील इंग्लिश मीडियम स्कूल, पडघा, लोकधारा प्रतिष्ठान, समाज विकास मंडळ समतानगर तसेच संयुक्त जयंती महोत्सव कमिटी, पडघा विभाग यांच्यासह विविध स्तरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# इ. 12 वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

## श्री ढोकेश्वर विद्यालयात गुणवत्तापूर्ण शिक्षण - सिताराम खिलारी पा.

टाकळी ढोकेश्वर : (स. गांवकरी)




टाकळी ढोकेश्वर येथील, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्य. विद्यालयाने याही वर्षी उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. पुणे बोर्डाकडून इ. 12 वीचा ऑनलाईन निकाल जाहीर झाला. इयत्ता बारावीच्या बोर्ड परीक्षेत उज्वल यश मिळविणाऱ्या व विद्यालयात प्रथम पाच आलेल्या कला व शास्त्र शाखेतील विद्यार्थ्यांचा संस्थेचे जेष्ठ विश्वस्त आदरणीय सितारामजी खिलारी उर्फ अण्णा यांचे हस्ते पालकांसमवेत सत्कार करण्यात आला.

विद्यालयाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात, विद्यार्थी व पालकांना शाल, बुके, गुलाब पुष्प व पेन देऊन आणि पेढे भरवून अण्णांनी सत्कार केला. व पुढील शैक्षणिक कार्यास शुभेच्छा दिल्या. अण्णांनी आपल्या भाषणातून सांगितले की, या विद्यालयाचे 66 व्या वर्षात पदार्पण असून, विद्यालयाने आजपर्यंत मोठा नावलौकिक मिळविलेला आहे. या विद्यालयाचे विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात चमकलेले आहे. या विद्यालयात गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळते. येथील सर्व स्टाफ त्यांच्या विषयात परिपूर्ण असून, येथे उच्च दर्जाचे शिक्षण दिले जाते. म्हणून आपण या विद्यालयातच आपल्या पाल्यांना व इतरांना प्रवेश घेण्यास सांगावे. असे आवाहन केले.

याप्रसंगी भोंद्रे गावचे सरपंच व विद्यालयाचे माजी विद्यार्थी मा. श्री. अभिजीत झावरे व डॉ. अरुण झावरे यांनीही आपल्या भाषणातून, विद्यालयातील शिक्षकांचे व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करत सर्वांचे अभिनंदन केले.

विद्यालयाचे प्राचार्य श्री. बाळासाहेब खिलारी यांनी सांगितले की, यावर्षी विद्यालयात शिक्षण विभागाचे कॉपीमुक्त अभियान राबविले. त्यास विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांनी मोठा प्रतिसाद दिला. त्यामुळे परीक्षा अतिशय शांततेत पार पडली. विद्यार्थ्यांनी यापुढे उच्च शिक्षण घेत चांगले यश मिळवून आपल्या शाळेचे, कुटुंबाचे व गावाचे नाव मोठे करावे. असे सांगत विद्यार्थी, शिक्षक व पालकांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

विद्यालयाचा विज्ञान शाखेचा शे. निकाल 96.42% तर कला शाखेचा शे. निकाल 88.88% लागला आहे. विज्ञान शाखेचे एकूण 224 विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते. यापैकी 216 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

विज्ञान शाखेतील पहिले पाच विद्यार्थी, कु. भक्ती वाळुंज 85%, चि. आदेश झावरे 84.83%, चि. तन्मय रोकडे 84.50%, कु. प्रेरणा झावरे 81.67%, कु. समृद्धी थोरे 78% कला शाखेचे एकूण 65 विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते. यापैकी 56 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेतील पहिले पाच विद्यार्थी चि. अशोक मदने 69.50%, कु. मोनिका गुंड 66.5%, कु. सिद्धीका वाबळे 64.67%, कु. सानिया शेख 64.33%, कु. सानिका पुरी 64.17%

आजच्या सत्कार समारंभ प्रसंगी श्री. अभिजीत झावरे (सरपंच भोंद्रे ), डॉ. अरुण झावरे, श्री. शंकर शेळके, श्री. गंगाधर धावडे (पत्रकार), श्री. दत्तात्रय वाळुंज, श्री. अरुण झावरे (वासुंदे), श्री. सुरेश झावरे, श्री. राजू पुरी, श्री. बाळासाहेब पवार, श्री. अशोक रोकडे (मेजर), श्री. संदीप रोकडे, श्री. छबुराव चौधरी सर यांचे सह अनेक पालक व महिला भगिनी उपस्थित होत्या. विद्यालयाच्या पर्यवेक्षिका श्रीम. मनिषा गाडगे मॅडम, कला समन्वयक प्रा. श्री. विजय सोबले, शास्त्र समन्वयक श्री. अशोक गांगड, प्रा. श्री. राजेंद्र ढोणे, प्रा. श्री. पोपट जगदाळे, प्रा. श्री.आतिश झावरे, प्रा.श्री. नितीन ढोकळे, प्रा. श्री. सुनील झावरे, प्रा. श्रीम. सुवर्णा दिघे, श्रीम.अनिता म्हस्के मॅडम, श्री. अनिकेत बांगर, श्री. सोमेश्वर होरणे, श्री. अमोल गोरे यांचे सह अनेक पालक, महिला भगिनी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्री. भाऊसाहेब हिंगडे यांनी केले. तर आभार ज्येष्ठ शिक्षक श्री. मल्हारी वाघस्कर यांनी मानले.

# मातेच्या ग्रंथतुलेच्या माध्यमातून सेवानिवृत्ती साजरी



पारनेर : (स. गांवकरी)

सेवानिवृत्त होणारे पदवीधर शिक्षक श्री. बाळासाहेब झुंगाजी खराबी यांनी आपली माता ग. भा. भिकुबाई झुंगाजी खराबी यांच्या ग्रंथतुला करून सेवानिवृत्ती कार्यक्रम साजरा केला. या कार्यक्रमात त्यांनी ३५ हजार रुपयांची पुस्तके मुख्यमंत्री 'माझी शाळा स्वच्छ, सुंदर शाळा' पुरस्कारप्राप्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मांडवे खुर्द यांना भेट दिली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. गुंफा कोकाटे होत्या. बाळासाहेब खराबी यांनी सांगितले की, "अल्पशिक्षित असूनही माझ्या ८६ वर्षीय आई दररोज तीन तास पुस्तक वाचन करतात. ही प्रेरणा घेऊन ग्रामीण भागात वाचन संस्कृती रुजवण्यासाठी हा प्रयत्न केला आहे." अहमदनगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी राबवलेल्या कुसुमाग्रज वाचन अभियानाला बळकटी देण्याचा हा प्रयत्न असल्याचेही त्यांनी नमूद केले. अहिल्याबाई होळकर जयंती त्रिशताब्दी निमित्त अहिल्याबाईंच्या जीवनावर आधारित पुस्तके पाहुण्यांना स्वागत म्हणून देण्यात आली. या कार्यक्रमात योजना विभागाचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे, विस्ताराधिकारी कांतीलाल ढवळे, डॉ. प्रदीप दाते, अॅड.बाबासाहेब खिलारी, सरपंच सौ. कमलताई गागरे, माजी सरपंच सोमनाथ आहेर, यशवंत जाधव, मनोहर लांडगे, शिक्षक नेते रावसाहेब रोहोकले, राष्ट्रवादीचे नेते रवींद्र राजदेव, जिल्हा प्रवक्ते मोहन रोकडे , माजी सरपंच ढवळू बागुल, माजी सरपंच जगदीश गागरे, पत्रकार बबनराव गायखे ,रविंद्र पायमोडे, भगवान वाळुंज, प्रवीण ठुबे, सतीश रोकडे, रामचंद्र झावरे, पो. मा. झावरे, विलास साठे, तारकराम झावरे, कारभारी बाबर, सुनील दुधाडे, प्रकाश गोरडे आदी मान्यवर उपस्थित होते. शिक्षण क्षेत्रात दीर्घकाळ योगदान देणारे बाळासाहेब खराबी यांचा हा उपक्रम ग्रामीण भागातील वाचन संस्कृतीसाठी प्रेरणादायी ठरला आहे. कार्यक्रमात उपस्थित सर्वांनी या सामाजिक दृष्टिकोनाची प्रशंसा केली. हा उपक्रम इतर शिक्षक व नागरिकांसाठी आदर्श ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# संयुक्त महाराष्ट्र पत्रकार महासंघ, मुंबई : स्थापना दिवस सोहळा

- महाराष्ट्र धर्म आणि पत्रकारिता यावर चिंतन व्हावे - पद्मश्री गिरीश प्रभुणे
- आजचा महाराष्ट्र जुन्नरचा, की सिन्नरचा ? बदलाची गरज - संजय आवटे
- मुलभूत गरजा पूर्ण होतील तो विकास - संजय आवटे.
- उद्योगनरीत 'महाराष्ट्र धर्म आणि पत्रकारिता' परिसंवाद
- महाराष्ट्र दिनी संयुक्त महाराष्ट्र पत्रकार महासंघाची स्थापना
- मराठी पाट्या खरवडल्या जाताना, वेदना हृदयावर होतात - गुणवंत पाटील

पिंपरी : (स. गांवकरी)





पिंपरी चिंचवड शहरात १ मे महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने संयुक्त महाराष्ट्र पत्रकार महासंघाची स्थापना व पत्रकारांच्या नव्या राज्यव्यापी चळवळीची सुरूवात करण्यात आली.

राज्यातील पत्रकारांना एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने संयुक्त महाराष्ट्र पत्रकार महासंघ, मुंबई या राज्यव्यापी संघटनेची स्थापना करण्यात आली असून पत्रकारांच्या हक्कांसाठी आणि सशक्त, जबाबदार पत्रकारितेसाठी सुरू झालेली ही केवळ संघटना नसून नव्या चळवळीची सुरुवात असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी व्यासपीठावर संयुक्त महासंघाचे संस्थापक अध्यक्ष गोविंद घोळवे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार शंकर जगताप, महापौर रवी लांडगे, पद्मश्री गिरीश प्रभुणे, न्यूज 18 मराठी चे संपादक, मंदार फणसे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, लोकमत चे संपादक संजय आवटे, मुक्तपीठ चे संपादक तुळशीदास भोईटे, महाराष्ट्र रिसर्च सेंटर चे संपादक महेश म्हात्रे, ज्येष्ठ विचारवंत संजय सोनवणी, गुणवंत पाटील, बेळगाव लाइव्ह चे संपादक प्रकाश बेळगोजी, बीव्हीजी ग्रुप चे अध्यक्ष हणमंतराव गायकवाड, उद्योजक उमेश चांदगुडे, बीएसए ग्रुप चे प्रमुख बाळासाहेब कदम, सीमा सावळे, म. ए. समिती चे सागर पाटील, संत ज्ञानेश्वर आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त डॉक्टर भावार्थ देखने व प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे उपस्थित होते. संयुक्त महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी १०६ हुतात्म्यांनी बलिदान दिल्यानंतरही अनेक प्रश्न आजही कायम असल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यभरातील पत्रकारांनी एकत्र येत या महासंघाची स्थापना केली. पत्रकारांच्या समस्या, बदलते माध्यमविश्व आणि आधुनिक पत्रकारितेची दिशा यावर या माध्यमातून व्यापक पातळीवर काम केले जाणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

या स्थापना सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी खासदार श्रीरंग बारणे होते, तर परिसंवादाचे उद्घाटन पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते झाले. यावेळी महापौर रवी लांडगे, आमदार शंकर जगताप तसेच महापालिकेतील विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमात 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि आधुनिक पत्रकारिता' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. यामध्ये लोकमतचे संपादक संजय आवटे, ज्येष्ठ पत्रकार तुळशीदास भोईटे, न्यूज १८चे संपादक मंदार फणसे,जेष्ठ विचारवंत लेखक संजय सोनवणी यांच्यासह अनेक मान्यवर पत्रकारांनी आपले विचार व्यक्त केले. बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात पत्रकारितेची विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिकवलेला महाराष्ट्र धर्म आत्मसात करण्याची गरज अधोरेखित केली.

पद्मश्री गिरीश प्रभुणे म्हणाले, "महाराष्ट्रात आज मराठी भाषा टिकवण्याची गरज निर्माण झाली आहे. संयुक्त महाराष्ट्र बनवताना भाषेचा इतिहास विसरता कामा नये. भाषिक शब्दकोश समृद्ध व्हावे. मराठी भाषेत इतर भाषेचे पर्यायी शब्द न वापरता अधिकाधिक मराठी भाषेतील शब्दांचा वापर व्हावा."

मंदार फणसे यांनी महाराष्ट्रातील विविधतेतून समृद्ध महाराष्ट्र रूप तसेच संयुक्त महाराष्ट्राची गरज यावर आपले विचार व्यक्त केले.

महाराष्ट्र धर्माच्या अनुषंगाने बोलत असताना संजय आवटे म्हणाले, "आपल्याला महाराष्ट्राची परंपरा जपण्याची गरज आहे. आज महाराष्ट्रात जात - धर्माच्या अनुषंगाने प्रचंड ध्रुवीकरण सुरू आहे. जात धर्माच्या पलीकडे जाऊन महाराष्ट्र धर्म टिकवला पाहिजे."

महेश म्हात्रे यांनी 'मराठी विन गाडा न चाले देशाचा'एकेकाळी अशी उक्ती असताना आज प्रचंड विरोधाभास दिसून येतो. महाराष्ट्रातील संपर्क वैचारिक, भावनिक पातळीवर एकत्र यायला हवा. मराठी भाषिकांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत हे सांगितले.

तुळशीदास भोईटे यांनी तरीसुद्धा पंचशील तत्वे विशद करताना, पत्रकारांसमोरील आव्हाने, पत्रकारांची तटस्थ भूमिका, निष्पक्षता स्पष्ट केली.

महाराष्ट्र एकीकरण समितीचे अभ्यासक गुणवंत पाटील यांनी कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी भाषेच्या पत्रकारांच्या वेदना व अनुभव मांडले. या ते म्हणाले मराठी भाषिकांच्या संघर्षासाठी उभ्या असलेल्या रस्त्यावरील संघर्ष करणाऱ्यांना पाठबळ देणे गरजेचे आहे. मराठी भाषेतील नावाच्या पाट्या खरवडल्या जात असून, त्याच्या वेदना मराठी भाषकांच्या हृदयावर होत आहेत. त्या जखमा अधिक वेदनादायी आहेत."

जेष्ठ विचारवंत संजय सोनवणी यांनी महाराष्ट्र राज्याचा भाषिक समृद्ध इतिहास सांगितला. मात्र, आज सर्व क्षेत्रातील उध्वस्त परिस्थिती बनल्याची खंत व्यक्त केली. कार्यक्रमाचे आयोजन महासंघाचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार गोविंद घोळवे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, प्रदेश सचिव नितीन शिंदे, शहराध्यक्ष रोहित आठवले तसेच महासंघाच्या पदाधिकारी व सभासदांनी केले होते. महाराष्ट्र दिनाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर झालेल्या या स्थापनेमुळे राज्यातील पत्रकारांना एक नवे सक्षम व्यासपीठ उपलब्ध झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी सातव व आभार अतुल क्षीरसागर यांनी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.

पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे

पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# थोडक्यात पण महत्वाचे

## मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान मूल्यमापन समितीवर पत्रकार सुर्यवंशी



तामसा (स. गांवकरी) : महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत ग्रामपंचायतींच्या कामकाजाचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्यासाठी विशेष समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीत पत्रकार प्रतिनिधी म्हणून दिपक सुर्यवंशी यांची निवड झाली. ग्राम विकास विभाग महाराष्ट्र शासनाचे आदेश, उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत जिल्हा परिषद नांदेड यांच्या सुचनेनुसार समीती स्थापन करण्यात आली, ही समिति चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यातील १६ ग्रामपंचायतींचे २६ एप्रिल ते १५ मे या कालावधीत सदर ग्रामपंचायतला प्रत्यक्ष भेट देऊन विकासकामे आणि प्रशासकीय पारदर्शकतेची तपासणी करणार आहे. गटविकास अधिकारी दशरथ अडेराघो यांच्या अध्यक्षतेखालील या समितीत पत्रकार प्रतिनिधी दिपक बाबुराव सुर्यवंशी,सदस्य,अशोक पवार,उप अभियंता (सा. बां) हदगाव,पंकज शेगावकर,उप अभियंता (पा.पु.) हदगाव,संग्राम कांबळे,गट शिक्षण अधिकारी हदगाव,बालासाहेब पवार विस्तार अधिकारी (पं.स.) हदगाव,विश्वनाथ मुंडकर विस्तार अधिकारी (पं.स.) हदगाव,कार्यरत आहेत. या समितीत पत्रकार प्रतिनिधी म्हणून दिपक सुर्यवंशी यांची निवड झाल्याने त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## १२वी परीक्षा निकालात मुलींची सरशी; उज्ज्वल यशाची परंपरा कायम





तामसा (स. गांवकरी) : निकाल जाहीर होताच तामसा परिसरात आनंदाचे वातावरण पसरले असून यंदाही मुलींनी उज्ज्वल यश संपादन करत मुलांपेक्षा सरशी केली आहे. विविध शाखांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींनी उच्च टक्केवारी मिळवत गावाचे नाव उंचावले आहे. तामसा येथील मनस्वी जेलेश रायपुलवार या विद्यार्थिनींन विज्ञान शाखेत 84.17तसेच कशिश अर्जुन जोशी यांनी कृषी( ॲग्री) शाखेत 83% गुण मिळवत उल्लेखनीय यश मिळवले. विशेषतः विज्ञान व कला शाखेतील मुलींनी उत्तम कामगिरी करत आपल्या मेहनतीचा ठसा उमटवला. या यशामागे विद्यार्थिनींचे परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरले आहे. हा दोन्ही मुलीचा माध्यमिक शिक्षण पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल च्या विद्यार्थिनी होत्या उच्च माध्यमिक शिक्षण या शाळेत नसल्यामुळे विद्यार्थ्याला बाहेरगावी शिक्षण घ्यावा लागते माजी विद्यार्थ्यांचा या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापक देविदास अक्कमवाड, परिवेक्षक डॉ.प्रज्ञान भोजनकर, धोंडगे, घोलप यांनी विद्यार्थीनीचा कौतुक करून अभिनंदन केलं कशिष जोशी ही विद्यार्थिनी भाजपा तालुका अध्यक्ष ममता जोशी यांची कन्या आहे. त्यांचे पण कौतुक होत आहे. "मुलींनी पुन्हा एकदा सिद्ध केले की त्या कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत," अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. दरम्यान, काही विद्यार्थ्यांनीही चांगले यश मिळवले असले तरी एकूण निकालात मुलींचे प्रमाण अधिक असल्याचे चित्र दिसून आले. तामसा परिसरात शिक्षणाबाबत वाढती जागरूकता आणि मेहनतीमुळे भविष्यातही असेच यश कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.




## सरस्वती विद्या मंदिरचा बारावी निकाल उज्वल; विज्ञान शाखेत ९६.५५% यश

किनवट (स. गांवकरी) : किनवट येथील सरस्वती विद्या मंदिर उच्च माध्यमिक विद्यालयाने आपल्या यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखत इयत्ता १२ वी (फेब्रुवारी/मार्च २०२६) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. कॉपीमुक्त अभियानांतर्गत पार पडलेल्या या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून विद्यालयाचा एकूण निकाल ७३.४४ टक्के लागला आहे. विशेष म्हणजे विज्ञान शाखेने तब्बल ९६.५५ टक्के निकाल नोंदवत बाजी मारली आहे. या यशामुळे विद्यार्थ्यांसह संपूर्ण विद्यालयाचे सर्वत्र कौतुक होत आहे. दि. २ मे २०२६ रोजी दुपारी १ वाजता निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. दरवर्षीप्रमाणे यंदाही विद्यालयाने गुणवत्तेच्या बाबतीत आपली परंपरा कायम राखली आहे. शाखानिहाय निकाल : विज्ञान शाखा: ९६.५५%, कला शाखा: ५१.११%, व्यावसायिक अभ्यासक्रम: ४५%, गुणवंत विद्यार्थी: विज्ञान शाखा: श्रेयस रमेश श्रीरामवार – ७८.६७% (प्रथम), कु. अपेक्षा गोविंद चक्करवार – ७५.६७% (द्वितीय), कु. प्राची अनिल आडे – ७४.५०% (तृतीय), कला शाखा: कु. सलोनी गणेश गुंजकर – ८३.५०% (प्रथम), कु. श्रुतिका हनमंत गुंजकर – ७९.१७% (द्वितीय), कु. जयश्री जनार्धन माघाडे – ७८.३३% (तृतीय) व्यावसायिक अभ्यासक्रमातही विद्यार्थ्यांनी समाधानकारक यश संपादन केले असून अनेक विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व्यंकटराव नेम्मानीवार, सचिव तथा मुख्याध्यापक कृष्णकुमार नेम्मानीवार, उपमुख्याध्यापक संजय चव्हाण, पर्यवेक्षक पहूरकर सर तसेच शिक्षकवृंद व कर्मचाऱ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. विद्यालयाच्या या यशामुळे परिसरात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे.

## पोर्टलसंबंधी प्रशिक्षणाचे आज आयोजन

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : ४ मे रोजी जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागासाठी आपले सरकार पोर्टलबाबतचे प्रशिक्षण मंगळवार दि ५ मे रोजी कै. डॉ. शंकरराव चव्हाण नियोजन भवन प्रेक्षागृह जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नांदेड येथे आयोजित करण्यात आले आहे, सर्व संबंधितांनी या प्रशिक्षणास उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. हे प्रशिक्षण नांदेड, लोहा, कंधार, अर्धापूर, मुदखेड, भोकर, हदगाव, नायगाव तालुक्यासाठी सकाळी १० वा. तर देगलूर, बिलोली, मुखेड, धर्माबाद, उमरी, हिमायतनगर, किनवट, माहूर तालुक्यासाठी दुपारी १ वा. हे प्रशिक्षण होणार आहे. ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय २८ जानेवारी २०२५ नुसार महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत अधिसूचित केलेल्या आपले सरकार पोर्टलवरुन नागरिकांना सेवा पुरविण्यासाठी युजर आयडी उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

## राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणांवर थातूर मातूर कार्यवाही

अर्धापूर (स. गांवकरी) : नांदेड-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील वाढती अपघातांची मालिका आणि वाहतुकीचा खोळंबा दुर करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण रोखठोक भूमिका घेऊन कार्यवाही करील असे वाटत होते. पण राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी नुसता गाजा वाजा करून कार्यवाहीचा फार्स केला होता. आज ही अर्धापूर ते असना नदीपर्यंतच्या मार्गावरील सर्व अतिक्रमणे, अवैध होर्डिंग्ज, पार्किंग आणि अनधिकृत दुकाने हटवण्याचा धाडसी निर्णय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने मोहीम हाती घेणार की मोहीम थंड बस्तात गुंडाळून ठेवणार अशी जोरदार चर्चा जनतेत होत आहे. अर्धापूर वळन रस्तावर सुध्दा अतिक्रमण झाले आहे.

# मान्सूनपूर्व कामे वेळेत पूर्ण करा

### आपत्ती टाळण्यासाठी सज्ज राहा — जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

जिल्ह्यात संभाव्य पावसाळी आपत्ती टाळण्यासाठी सर्व विभागांनी मान्सूनपूर्व कामे वेळेत पूर्ण करावीत आणि आपत्ती व्यवस्थापनाचे आराखडे तात्काळ सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील डॉ. शंकरराव चव्हाण नियोजन भवन येथे आयोजित मान्सूनपूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, अपर पोलिस अधिक्षक सूरज गुरव, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी किशोर कुऱ्हे, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, यावर्षी पावसाचे प्रमाण तुलनेने कमी असले तरी उष्णतेमुळे अचानक मुसळधार पावसाची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पूरपरिस्थिती उद्भवू नये यासाठी प्रशासनाने सज्ज राहणे गरजेचे आहे. विष्णुपूरी धरणात सध्या पिण्याच्या पाण्याचा पुरेसा साठा असून त्याचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच धरणाचे गेट, नवीन पाईपलाईन कामे यांची स्थिती तपासण्याचे निर्देश देण्यात आले. मागील वर्षी मुखेड, नायगाव, बिलोली, कंधार यासह विविध तालुक्यांमध्ये पूरस्थिती निर्माण होऊन अनेक गावांचा संपर्क तुटला होता. यंदा अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी ठोस उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले. शहरातील नाल्यांची स्वच्छता करून सखल भागात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी, तसेच पूल आणि रस्त्यांवरून पाणी वाहून जाऊन



नागरिक अडकणार नाहीत यासाठी नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आरोग्य विभागाला ग्रामीण भागात औषधसाठा मुबलक ठेवण्याचे, तसेच सर्पदंशावरील औषधे सर्व आरोग्य केंद्रात उपलब्ध ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. पशुसंवर्धन विभागाने नदीपात्रात पशुधन बांधू नये यासाठी जनजागृती करावी, असेही सांगण्यात आले.

बैठकीच्या शेवटी, सर्व विभागांनी तालुका पातळीवरील कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करून आपत्ती व्यवस्थापनाचे आराखडे तात्काळ जिल्हा प्रशासनाकडे सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी कर्डिले यांनी दिले. जिल्हाधिकारी यांनी सर्व उपविभागीय अधिकारी यांच्या अडचणी व समस्या जाणून घेतल्या. यावर उपाययोजना करण्याबाबत मार्गदर्शन केले व सर्व विभागांनी समन्वय ठेवून कामे पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

## बालाजी मंदिर परिसरात वीज समस्येचा प्रश्न



किनवट : (स. गांवकरी)

शहरातील प्रभाग क्रमांक ५ चे नगरसेवक चंद्रशेखर रंगराव नेम्मानीवार यांनी प्रभागातील स.वि.म. परिसरातील वीज पुरवठा समस्येबाबत महावितरण विभागाकडे लक्ष वेधले आहे. येथील बालाजी मंदिराजवळील वीज पुरवठा वारंवार खंडित होणे व कमी व्होल्टेजची समस्या निर्माण होत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. सदर परिसरात सध्या कार्यरत असलेली 100 वॅट क्षमतेची डी.पी. वाढत्या वीज वापरामुळे अपुरी पडत असून, यामुळे व्होल्टेज कमी होणे, वीज पुरवठा खंडित होणे अशा समस्या निर्माण होत आहेत. याचा परिणाम नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होत आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक चंद्रशेखर रंगराव नेम्मानीवार यांनी उपअभियंता, महावितरण, किनवट विभाग यांना निवेदन देत संबंधित ठिकाणी 100 वॅट डी.पी. बदलून 200 वॅट क्षमतेची नवीन डी.पी. बसविण्याची मागणी केली आहे. यामुळे वीज पुरवठा सुरळीत होऊन नागरिकांना दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते राजू सातूरवार यांच्यासह प्रभागातील नागरिक उपस्थित होते. नागरिकांनीही या समस्येचे तात्काळ निराकरण करण्याची मागणी करत महावितरण विभागाने लवकरात लवकर कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## आ. भीमराव केराम यांच्या कन्येचा विवाह सोहळा उत्साहात

किनवट : (स. गांवकरी)

किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव केराम यांच्या कन्येचा विवाह सोहळा अत्यंत साध्या, पारंपरिक आणि संस्कारपूर्ण वातावरणात उत्साहात पार पडला. सध्याच्या काळात वाढत्या आडंबरयुक्त आणि खर्चिक विवाहसोहळ्यांच्या पार्श्वभूमीवर या सोहळ्याने समाजासमोर साधेपणाचा एक प्रेरणादायी आदर्श ठेवला आहे. ४५ अंश सेल्सिअसच्या कडक उन्हातही हा विवाह सोहळा अत्यंत नियोजनबद्ध आणि सुटसुटीत पद्धतीने पार पडला. क्रांतीशरण केराम यांच्या मार्गदर्शनाखाली युवानेते ॲड. प्रतीक केराम आणि संदेश केराम या भावंडांच्या सूक्ष्म नियोजनामुळे हजारो उपस्थित पाहुण्यांना कोणताही त्रास जाणवला नाही. लग्नस्थळी ठिकठिकाणी थंड पाण्याची व्यवस्था, संपूर्ण मंडपात कूलर्स व पंखे, तसेच सावलीची योग्य सोय करण्यात आली होती. त्यामुळे कडक उन्हातही वातावरण



प्रसन्न राहिले. या विवाह सोहळ्याचे विशेष म्हणजे यात कोणत्याही प्रकारचा दिखावा किंवा पाश्चात्य भपका नव्हता. डीजे, स्पेशल पार्टी किंवा अनावश्यक खर्च टाळून पूर्णतः पारंपरिक पद्धतीने विवाह संपन्न करण्यात आला. 'ढेमसा' वाद्यांच्या निनादात आणि गोंडी संस्कार विधींनुसार झालेल्या या सोहळ्याने भारतीय संस्कृतीची झलक उपस्थितांना अनुभवता आली.

राजकीय क्षेत्रातील आजी-माजी खासदार, आमदार, तसेच विविध पक्षांचे पदाधिकारी, अधिकारी-कर्मचारी आणि हजारो नागरिक या सोहळ्यास उपस्थित होते. नांदेडचे जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनीही या प्रसंगी आवर्जून उपस्थिती लावली. सकाळपासूनच वधू-वरांना आशीर्वाद देण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिकांनी गर्दी केली होती. आमदार केराम यांचे जावई जंगु सलाम हे जलसंपदा विभागात उपअभियंता म्हणून कार्यरत असून, या सोहळ्यात बाबुराव केंद्रे यांनी आपल्या प्रभावी सूत्रसंचालनातून कार्यक्रमाला विशेष रंगत आणली. विशेष म्हणजे, एवढ्या मोठ्या प्रमाणावर उपस्थिती असूनही संदेश केराम मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी अत्यंत शिस्तबद्ध आणि आत्मीयतेने सर्व व्यवस्थापन केले. चोख व्यवस्था, चविष्ट भोजन आणि साधेपणातील भव्यता यामुळे या विवाह सोहळ्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

एकूणच, आमदार भीमराव केराम यांनी आपल्या कन्येच्या विवाहातून अनावश्यक खर्च, दिखावा आणि पाश्चात्य अंधानुकरण टाळून समाजासमोर साधेपणाचा आणि संस्कृती जपण्याचा एक आदर्श ठेवला आहे. हा आदर्श इतरांसाठी प्रेरणादायी ठरेल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## गोदावरी नदीच्या कल्हाळ पात्रातुन अवैध रेती साठा जप्त

नवीन नांदेड : (स. गांवकरी)

ऑपरेशन क्रॅक डाऊन अंतर्गत गोदावरी नदी पात्रातील अवैध रेती उपसा करूण साठवुन ठेवणा-या रेती माफियावर नांदेड ग्रामीण पोलीसांनी छापा कारवाई करुन एकूण 51,24,300/- रुपयाचा मुद्देमाल केला जप्त,सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून सदरील कार्यवाही ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड व पथकाने केली आहे. अविनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी ऑपरेशन क्रेक डाऊन अंतर्गत अवैधरित्या गोण खनिज (रेती) उपसा व वाहतुक करणारे लोकांवर कारवाई करणे बाबत सर्व पोस्ट प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले आहे. त्या अनुषंगाने ओमकांत चिंचोलकर, पोलीस निरीक्षक पो स्टे नांदेड ग्रामीण यांचे आदेशान्वये दिनांक 03 मे 26 रोजी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोउपनि ज्ञानेश्वर मटवाड

### सहाजणां विरूद्ध गुन्हा दाखल, ५१ लाखांच्या मुद्देमाल जप्त



पोहेकॉअर्जुन मुंडे, पोकों विष्णु कल्यानकर, पोको संतोष पवार, पोको असीफ अली, पोकों गवेंद्र सिरमलवार, सर्व नेमणुक पो.स्टे. नांदेड ग्रामीण अंमलदार यांचे सह पो. स्टे. हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना 10 वाजता गोपनीय माहिती मिळाली की, कल्लाळ शिवारातील गोदावरी नदीपात्राचे किणा-यावर काही इसम नदीतुन अवैध रेती उपसा करूण साठवुन ठेवत आहेत.. अशी गोपनीय माहीती मिळाल्यावरुष्ण वरील अधिकारी व अंमलदार असे दोन पंचाना सोबत घेवुन मिळालेल्या माहीतीच्या ठिकाणी 12.00 वाजताचे सुमारास छापा मारला असता पोलीसांना पाहुन वरील पाच आरोपी इसम तेथुन पळून गेले. सदर तराफे व इंजीन ईतर साहीत्य हे बाबाराव सिरसागर रा.कल्लाळ यांचे असल्याचे समजले.

सदर नदीपात्रात असलेले वरील मुद्देमाल नदीपात्रातुन आनने शक्य नसल्याने ते जागीच तोडुन जाळून नाश केले व नदी काठी उपसा करूण साठवून ठेवलेली 10 ब्रास रेती दोन पंचा समक्ष जप्ती पंचनामा करून दुस-या वाहणात टाकून पो.स्टे.ला आनुन जमा केली व सहा आरोपीतां विरूद्ध कलम 303(2) 3(5) था. न्या.से, सहकलम 48 (7), 48(8) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम व पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम व 15 व सार्वजनीक संपत्ती नुकसान अधिनियम कलम 3,7 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ऑपरेशन क्रॅक डाऊन अंतर्गत गोदावरी नदी पात्रातील अवैध रेती उपसा करूण साठवुन ठेवणा-या रेती माफियावर नांदेड ग्रामीण पोलीसांनी छापा कारवाई करुन एकूण 51,24,300/- रुपयाचा मुद्देमाल केला जप्त केला असून या प्रकरणी पोहेका अरजृन केशव मुंडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ग्रामीण पोलीस बाबाराव क्षिरसागर रा.कल्हाळ व अनोळखी पाच जणा विरुद्ध गुन्हा दाखल केला असून वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेल्या कामगीरीचे अविनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी कौतुक केले आहे.

## तरुणांनी करिअरला प्राधान्य द्यावे – राकेश पाचपुते

श्रीगोंदा : (स. गांवकरी)



■ काष्टी संस्थेत शिवतेज दुतारेचा सन्मान

प्रत्येक आई-वडिलांचे स्वप्न असते की आपल्या मुलांनी उच्च शिक्षण घेऊन चांगली नोकरी, उद्योग किंवा अधिकारी पद मिळवावे. मुलांनी कर्तृत्वाने कुटुंबाचे आणि समाजाचे नाव उज्वल करावे, यासाठी तरुणांनी जीवनात करिअरला प्राधान्य द्यावे, असे आवाहन सहकार महर्षी काष्टी सेवा संस्थेचे अध्यक्ष राकेश पाचपुते यांनी केले. श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील रहिवासी शिवतेज संतोष दुतारे यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत स्पर्धा परीक्षेत यश मिळवून नवी मुंबई येथील पोलीस मुख्यालयात महाराष्ट्र पोलीस दलात प्रवेश केला आहे. त्यांच्या या यशाबद्दल सहकार महर्षी काष्टी सेवा संस्था व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष शहाजी भोसले, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष दत्ता पाचपुते, जिल्हा सचिव पिटर रणसिंग, प्रा. राम सोनवणे, माजी ग्रामपंचायत सदस्य नवनाथ राहिंज आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी राकेश पाचपुते म्हणाले की, लहानपणी आई-वडिलांचे छत्र हरपल्यानंतर शिवतेज व त्यांच्या भावंडांचा सांभाळ त्यांच्या वृद्ध आजीने केला. समाजातील विविध घटकांनीही त्यांना मदतीचा हात दिला. या सर्वांची जाणीव ठेवत जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या बळावर शिवतेजने यश संपादन केले आहे. पुढील काळात अधिक स्पर्धा परीक्षा देऊन अधिकारी पदापर्यंत पोहोचावे, तसेच खाकी वर्दीचा उपयोग समाजातील अन्याय-अत्याचार दूर करण्यासाठी व गरजूंच्या मदतीसाठी करावा, असा सल्लाही त्यांनी दिला.

# शिवणी तांड्यात 'ऑपरेशन क्रॅक डाऊन"

किनवट : (स. गांवकरी)

किनवट तालुक्यातील शिवणी व शिवणी तांडा येथे नांदेड जिल्हा पोलिसांनी रविवारी (दि. 03 मे) पहाटे 'ऑपरेशन क्रॅक डाऊन" अंतर्गत राबविलेल्या व्यापक धडक (मास रेड) कारवाईमुळे अवैध हातभट्टी दारू, रसायन मिश्रित शिंदी आणि गुटखा व्यवसायावर मोठा घाव बसला आहे. अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या मोहिमेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, अनेक वर्षांपासून बिनधास्तपणे सुरू असलेल्या बेकायदेशीर धंद्यांना मोठा धक्का बसल्याचे चित्र आहे. पहाटेच पोलिसांनी अचानक छापे टाकत कारवाईला सुरुवात केली. दुपारपर्यंत अखंड सुरू असलेल्या या



मोहिमेत तब्बल १० अधिकारी व १०० पेक्षा अधिक पोलिस कर्मचाऱ्यांचा मोठा फौजफाटा सहभागी झाला होता. शिवणी व तांडा परिसर अक्षरशः पोलिस छावणीत परिवर्तित झाला होता. कारवाईदरम्यान हजारो लिटर रसायन मिश्रित अवैध हातभट्टी दारू व शिंदी जप्त करून तत्काळ नष्ट करण्यात आली. तसेच हातभट्टीसाठी साठवून ठेवलेले मोहफुलाचे शेकडो पोते जप्त करण्यात आले. या साठ्याचे प्रमाण इतके प्रचंड होते की जवळपास दोन ट्रॅक्टरभर मोहफुले पोलिसांनी जप्त केली. यावरून या अवैध व्यवसायाचे जाळे किती व्यापक पसरले आहे, हे स्पष्ट झाले. याशिवाय रसायनयुक्त शिंदी तयार करून विक्री करणाऱ्यांवर आणि गुटखा विक्रेत्यांवरही पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला. एका गुटखा तस्कराला ताब्यात घेण्यात आले असून, या संपूर्ण प्रकरणात ३० ते ४० जणांवर गुन्हे दाखल होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

किनवट तालुक्यातील ग्रामीण व तांडा भागात अवैध हातभट्टी दारू, रसायन मिश्रित शिंदी आणि गुटखा विक्रीचा व्यवसाय गेल्या काही वर्षांत झपाट्याने वाढला आहे. हे धंदे केवळ कायद्याचे उल्लंघन करणारे नाहीत, तर ते थेट जनतेच्या जीविताशी खेळ करणारे आहेत. अशा प्रकारच्या रसायनयुक्त मद्यामुळे विषबाधा, अंधत्व आणि मृत्यूच्या घटनांची शक्यता कायम असते. या अवैध व्यवसायांमुळे तरुण पिढी व्यसनाधीन होत असून, अनेक कुटुंबे आर्थिक व सामाजिक अडचणीत सापडत आहेत. गुटखा सेवनामुळे कर्करोगासारख्या आजारांचे प्रमाण वाढत आहे, तर हातभट्टी दारूमुळे आरोग्य धोक्यात येत आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ कायद्यापुरता मर्यादित नसून सामाजिक व आरोग्यविषयक गंभीर समस्या बनला आहे. शिवणी तांड्यातील ही कारवाई प्रभावी ठरली असली तरी, केवळ एकदाच कारवाई करून हा प्रश्न पूर्णतः सुटणार नाही. किनवट परिसरासह तालुक्यातील इतर भागांमध्येही अशाच प्रकारचे अवैध धंदे सुरू असल्याची चर्चा असून, पोलिसांनी नियमितपणे 'ऑपरेशन क्रॅक डाऊन" सारख्या मोहिमा राबविणे अत्यावश्यक आहे. सातत्यपूर्ण आणि नियोजनबद्ध कारवाईमुळेच या अवैध जाळ्याला आळा बसू शकतो. पोलिस प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, त्यांच्या परिसरात सुरू असलेल्या बेकायदेशीर धंद्यांची माहिती पोलिसांना द्यावी. स्थानिकांच्या सक्रिय सहभागामुळेच अशा मोहिमा अधिक यशस्वी होऊ शकतात. या कारवाईनंतर नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून, पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ होत असल्याचे दिसून येते. अवैध धंद्यांवर कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी केवळ कारवाई पुरेशी नाही. प्रशासनाने व्यसनमुक्ती अभियान, जनजागृती, तसेच पर्यायी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. तांडा व ग्रामीण भागात विशेष लक्ष केंद्रित करून सर्वसमावेशक उपाययोजना राबविण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## उंडेमळा शाळेतील विविध उपक्रम कौतुकास्पद : प्रफुल्ल तोटेवाड

श्रीगोंदा (स. गांवकरी) : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उंडेमळा येथील जिल्हा परिषद शाळेत राबविण्यात येणारे विविध उपक्रम अत्यंत कौतुकास्पद असून इतर शाळांनीही त्यांचा आदर्श घ्यावा, असे प्रतिपादन वसमत (जि. हिंगोली) येथील गटविकास अधिकारी प्रफुल्ल तोटेवाड यांनी केले. मुख्यमंत्री समृद्ध ग्राम पंचायतराज अभियानांतर्गत तपासणी समितीने मढेवडगाव येथील उंडेमळा जिल्हा परिषद शाळेला भेट दिली. यावेळी हस्ताक्षर सुधार उपक्रम, अप्रगत विद्यार्थ्यांसाठी 'झटपट वाचन' प्रकल्प, कुशाग्र विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, तज्ज्ञांची व्याख्याने, शिवजयंती उत्सव, 'किल्ले बनवा' स्पर्धा तसेच 'मिशन आपुलकी' अंतर्गत लोकसहभागातून शाळेचा विकास अशा विविध उपक्रमांची त्यांनी पाहणी करून समाधान व्यक्त केले. याशिवाय शाळेतील सीसीटीव्ही कॅमेरे, स्वच्छता संकुल, वॉटर फिल्टर सुविधा, डिजिटल शिक्षण, स्वच्छ व सुंदर परिसर, शालेय नोंदी तसेच पालकांच्या गटांद्वारे विद्यार्थ्यांच्या दैनंदिन अभ्यासावर ठेवला जाणारा भर यांचीही त्यांनी पाहणी केली.



## श्रीगोंदा महाविद्यालयाचा १२ वी बोर्ड परीक्षा निकाल ९५.३७%

- विज्ञान शाखेची अक्षता आढाव तालुक्यात अव्वल

श्रीगोंदा (स. गांवकरी) : रयत शिक्षण संस्थेचे महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा यांचा इयत्ता १२ वी बोर्ड परीक्षा २०२६ चा निकाल अत्यंत उल्लेखनीय लागला असून महाविद्यालयाने एकूण ९५.३७ टक्के निकालाची नोंद केली आहे. यामध्ये विज्ञान शाखेचा निकाल ९७.९३ टक्के, वाणिज्य शाखेचा ९३.५१ टक्के, तर कला शाखेचा ९०.४१ टक्के इतका लागला आहे. या यशात विज्ञान शाखेतील कु. अक्षता रवींद्र आढाव हिने ९१.६७ टक्के गुण मिळवत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. कु. पूर्वा बाळासाहेब घायाळ (९१.०० टक्के) हिने द्वितीय, तर कु. साक्षी भास्कर राहींज (८६.८३ टक्के) हिने तृतीय क्रमांक मिळवला.

वाणिज्य शाखेत कु. श्रुती मच्छिंद्र बोरुडे (७६.१७ टक्के), कु. राधा रामकिसन निखरट (६८.५० टक्के) व कु. तनुजा शत्रुघ्न ओहळ (६७.३३ टक्के) यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. कला शाखेत कु. वर्षा मारुती साबळे (८२.५० टक्के), कु. प्रतीक्षा खंडू उदमले (७९.८३ टक्के) व कु. प्रतीक्षा धनराज भिसे (७८.३३ टक्के) यांनी अनुक्रमे प्रथम तीन क्रमांक मिळवले. यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष तथा माजी मंत्री बबनराव पाचपुते, रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी आमदार राहुल जगताप, स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य बाबासाहेब भोस, महावीर पटवा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. नितीन थोरात, ज्युनियर कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. श्रीकांत थोरात, पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले. महाविद्यालयाच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विद्यार्थ्यांच्या परिश्रमाला आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाला मिळालेलं हे यश प्रेरणादायी ठरत आहे.

## हज यात्रेसाठी पठाण रहीम खान यांचा भावपूर्ण निरोप; शुभेच्छांचा वर्षाव



वसमत (स. गांवकरी) : शहरातील प्रसिद्ध उद्योजक तथा किसान ट्रॅक्टर्स एजन्सीचे मालक पठाण रहीम खान ऊर्फ कलीम पठाण हे इस्लाम धर्मीयांच्या पवित्र अशा हज यात्रेसाठी आई व पत्नीसमवेत रवाना होत आहेत. हज ही प्रत्येक मुस्लिमासाठी अत्यंत पवित्र व जीवनातील महत्त्वाची धार्मिक यात्रा मानली जाते. या पार्श्वभूमीवर त्यांच्या निवासस्थानी भावपूर्ण वातावरणात निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. हज यात्रेस प्रस्थान करण्यापूर्वी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मित्रपरिवार, नातेवाईक आणि समाजातील विविध मान्यवरांनी त्यांच्या घरी भेट देत सदिच्छांचा वर्षाव केला. यामध्ये माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक अ. हफीज अ. रहेमान, सेवानिवृत्त नायब तहसीलदार शेख करिमोद्दीन, ज्येष्ठ विधिज्ञ सिराज आलम, सेवानिवृत्त नायब तहसीलदार सलीम फारुखी, नगरसेवक शेख हारुण दालवाले, शासकीय कंत्राटदार नईम कुरेशी, काँग्रेसचे शहराध्यक्ष शेख अलीमोद्दीन, अमजद पठाण नमम,साजिद , युनूस खान, यासर तांबट, हारुन भाया, नवीद अहेमद, ॲड मोइज,अनवर फारुखी, सय्यद इसरार, सलीम मेमन, खलील बागवान, वाजीद बेग, शेख खाजा मिया, बबलू आदींचा समावेश होता. यावेळी उपस्थितांनी पठाण कुटुंबीयांना हज यात्रा यशस्वी, सुरक्षित व मंगलमय होण्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच त्यांनी समाजासाठी सदैव कार्यरत राहून सामाजिक बांधिलकी जपावी, अशी अपेक्षाही व्यक्त केली. निरोप समारंभात धार्मिक वातावरणात दुआ करण्यात आली नंतर जेवणाचा स्वाद घेतला असून, सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद व समाधानाचे भाव दिसून आले. पठाण रहीम खान यांच्या हज यात्रेमुळे त्यांच्या कुटुंबीयांसह शहरातील नागरिकांमध्येही आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## ४ वर्षांच्या मुलीवर द्विपक्षीय कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वी



पुणे (स. गांवकरी) : Jupiter Hospital Pune येथे ४ वर्षांच्या मुलीवर अत्याधुनिक द्विपक्षीय (बायलेट्रल) कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली असून, श्रवणशक्ती पुनर्संचयित करण्याच्या दृष्टीने हा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. रुग्णकेंद्रित आणि प्रगत आरोग्यसेवेच्या दिशेने उचललेले हे मोठे पाऊल आहे. ही शस्त्रक्रिया प्रख्यात ईएनटी तज्ञ Dr. Colonel Inderdeep Singh आणि Dr. Sumitpal Bhatti यांनी अत्यंत यशस्वीपणे पार पाडली. तीव्र श्रवणदोष असलेल्या या बालरुग्णामध्ये उपचारानंतर लक्षणीय सुधारणा दिसून आली आहे. डॉ. कर्नल इंदरदीप सिंग म्हणाले, "नेक्सा इम्प्लांट भविष्यात नवीन बाह्य प्रोसेसरसोबत सहज अपग्रेड करता येते, ज्यामुळे अधिक समृद्ध श्रवण अनुभव मिळू शकतो.

# पर्यावरण संवर्धनाची व्यापक चळवळ उभारणे आवश्यक

**पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील : 'ग्रीन सिटी' मोहिमेअंतर्गत वृक्षलागवड उपक्रमाचा शुभारंभ**

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



शहरे झपाट्याने विस्तारत असताना वाढते प्रदूषण नागरिकांच्या जीवनावर गंभीर परिणाम करत आहे. बदलत्या जीवनशैलीची मोठी किंमत समाजाला मोजावी लागत असून, वैद्यकीय सर्वेक्षणांतूनही प्रदूषणामुळे विविध आजारांचे प्रमाण वाढत असल्याचे स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर 'ग्रीन सिटी'सारख्या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाची व्यापक चळवळ उभारणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

साईद्वारका सेवा ट्रस्ट आणि अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त आयोजनाने 'ग्रीन सिटी' मोहिमेअंतर्गत एका वर्षात एक लाख वृक्षलागवडीच्या उपक्रमाचा शुभारंभ पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या हस्ते शहरातील माऊली सभागृह येथे झाला. यावेळी महापौर ज्योती गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, तसेच महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, वाढती वाहतूक, वाहनांची वाढती संख्या, वेगाने उभ्या राहत असलेल्या वसाहती आणि पर्यावरणाकडे होणारे दुर्लक्ष यामुळे शहरातील प्रदूषणात लक्षणीय वाढ होत आहे. याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असून, या समस्येकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. 'ग्रीन सिटी' हा उपक्रम या पार्श्वभूमीवर अत्यंत उपयुक्त ठरणार असून, शहराच्या सर्वांगीण विकासात हरित क्षेत्राचा समतोल राखणे अत्यावश्यक आहे.

ते पुढे म्हणाले, केवळ वृक्षलागवड करून थांबणे पुरेसे नाही, तर त्या वृक्षांचे संगोपन आणि संवर्धन करणे अधिक महत्त्वाचे आहे. वृक्षलागवड कार्यक्रमापुरती मर्यादित न राहता ती कायमस्वरूपी व्हावी, यासाठी सर्वांनी जबाबदारीने पुढाकार घेणे आवश्यक आहे. प्रत्येक भागात 'ग्रीन स्पेसेस' विकसित करण्याबरोबरच शहराच्या रचनेत पर्यावरणपूरक बदल करणे ही सद्यकाळाची निकड आहे.

राज्यात जलसंपदा विभागामार्फत सुमारे पाच हजार एकर जमीन अतिक्रमणमुक्त करण्यात आली असून, जलस्रोतांचे संरक्षण करण्यासाठी विविध उपाययोजना राबविल्या जात आहेत. नद्यांमधील वाढते प्रदूषण ही चिंतेची बाब असून, पाण्याच्या प्रदूषणावर नियंत्रणासाठी ठोस उपाय योजणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. पर्यावरण विषयक लोकशिक्षणाची चळवळ उभारणे अत्यावश्यक असून, त्यातून नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण होण्यास मोठी मदत होईल, असेही ते म्हणाले. शहराचे नियोजन दीर्घकालीन दृष्टिकोनातून केले जात असून, आधुनिक व शाश्वत विकासाला प्राधान्य दिले जात आहे. शहर अधिक स्मार्ट बनविण्यासोबतच 'क्लीन अँड ग्रीन सिटी' ही संकल्पना प्रत्यक्षात आणणे हे प्रशासनाचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी नमूद केले.

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी प्रास्ताविकामध्ये 'ग्रीन सिटी' मोहिमेबाबत माहिती दिली. मोहिमेत सहभागी स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींचा पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास विविध संस्थांचे पदाधिकारी, प्रतिनिधी, विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. रवींद्र भोळे यांचे त्यागम निष्काम कर्मयोगी कार्य स्फूर्तीदायक

पुणे : (स. गांवकरी)



वरकरणी सर्वसामान्य वाटणारे परंतु सेवाव्रती कर्मशिल्पी कार्यकर्त्यांचा एवढा मोठ्या स्तरावर सत्कार, पुरस्कार करणे ही साधी गोष्ट निश्चितच नाही. पुरस्कारामुळे प्रेरणा प्रोत्साहन मिळते व प्रेरणेमुळे राष्ट्र घडते. समाजाप्रती काहीतरी देणे आहे ही भावना प्रत्येकाने जपून प्रत्यक्षात आचरणात आणली पाहिजे. त्यागमय समर्पित कार्य करून डॉ.मणीभाई देसाईंच्या जयंतीदिनी प्रेरणा देण्याचे स्फूर्तीदायक कार्य समाजसेवक डॉ.रवींद्र भोळे करीत आहे. त्यांनी स्वतःचा विचार न करता समाजाचा विचार करून निष्काम कर्मयोगी कार्य केलेली आहेत. डॉ.रवींद्र भोळे यांचे त्यागमय निष्काम कर्मयोगी कार्य स्फूर्तीदायक आहे असे मत खादी आणि ग्रामोद्योग मंत्री स्वतंत्र कार्यभार मंत्रालय मुंबई रवींद्र साठे यांनी येथे व्यक्त केले. मॅगसेस अवॉर्ड विनर पद्मश्री डॉ. मणीभाई देसाई यांच्या एकशे सहाव्या जयंती निमित्ताने येथे राष्ट्रीय व राज्यस्तरीय कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. पद्मश्री डॉ. मणी भाई देसाई प्रतिष्ठान क्रीडा मंत्रालय, नीती आयोग, एम एस एम इ उद्यम मंत्रालय भारत सरकार सलग्नित संस्थेच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पद्मश्री डॉ मणी भाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार समारंभात मार्गदर्शन करताना ना.रवींद्र साठे यांनी वरील मत व्यक्त केले.

## महाअनुष्ठान निमित्त रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

- २३४ भाविकांनी केले रक्तदान
- सामाजिक व धार्मिक कार्यातून शांती, एकता व सेवेचा संदेश -डॉ. विलास मढीकर

अहिल्यानगर : (स. गांवकरी)




संत रामपाल जी महाराज यांनी नेहमीच सेवा कार्याला महत्त्व दिले आहे.रक्तदान सर्वश्रेष्ठ दान आहे.सध्या रक्ताचा तुटवडा सर्वत्र मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. मे महिन्यामध्ये कडक ऊन असल्यामुळे व शिबिरे होत नसल्याने महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात रक्ताचा तुटवडा जाणवत असतो.

या कालावधीत सतलोक आश्रम ढवळपुरी येथे संत रामपाल जी महाराज यांच्या भक्तांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली आहे.संत रामपालजी महाराज सतलोक आश्रम ढवळपुरी अहिल्यानगर महाराष्ट्र सेवा कमिटीचे वतीने रक्तदान शिबिराचे कार्य कौतुकास्पद आहे. संत रामपाल महाराजांच्या भाविकांनी सामाजिक व धार्मिक कार्यातून शांती,एकता व सेवेचा संदेश दिला आहे. असे प्रतिपादन जनकल्याण रक्तपेढीचे जनसंपर्क अधिकारी डॉ.विलास मढीकर यांनी केले आहे. सतलोक आश्रम ढवळपुरी येथे संत रामपाल महाराज महाअनुष्ठान निमित्त जनकल्याण रक्तकेंद्र व सिव्हिल हॉस्पिटल रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

या रक्तदान शिबिरात २३४ भाविकांनी रक्तदान केले.तसेच सात जोडप्यांचे हुंडामुक्त विवाह लावण्यात आले,ज्याने समाजातील चुकीच्या प्रथा नष्ट करण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलले गेले.यावेळी महाराष्ट्र,कर्नाटक,आंध्र प्रदेश येथून आलेल्या लाखो भक्तांनी भंडाऱ्याचा आनंद लुटला. मुनिंदर धर्मार्थ ट्रस्टने संत रामपाल जी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली सतलोक आश्रम, ढवळपुरी, पारनेर, अहिल्यानगर (महाराष्ट्र) येथे हे महा-अनुष्ठानाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाद्वारे शांती, एकता व सेवेचा संदेश लाखो लोकांपर्यंत पोहोचत आहे.

सत लोक आश्रम ढवळपुरी महाराष्ट्र सेवादार कमिटीचे या रक्तदानाच्या महान कार्याचा गौरव प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला.

## बालकांवरील अत्याचार प्रकरणी भीमशक्ती संघटनेच्यावतीने आंदोलन

**आरोपींना कठोर शिक्षेची पदाधिकारी यांची मागणी**

राजगुरुनगर : (स. गांवकरी)



नसरापूर (ता.भोर) व खालुंब्रे (ता. खेड) येथे अल्पवयीन बालकांवर अत्याचार करून हत्या केल्याच्या घटनेचा भिमशक्ती संघटनेच्या वतीने निषेध करत आरोपींना तात्काळ फाशीची शिक्षा देण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

पुणे जिल्ह्यातील नसरापूर (ता. भोर) येथे एका चिमुकल्या मुलीवर अत्याचार करून हत्या केल्याची घटना नुकतीच घडली असून, त्याचप्रमाणे पुणे जिल्ह्यातील खालुंब्रे (ता. खेड) येथे चार वर्षांच्या बालकावर अमानुष अत्याचार करून हत्या करण्यात आल्याने सदर घटनेने संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे. या दोन्ही घटनांच्या निषेधार्थ राजगुरुनगर येथील भिमशक्ती संघटनेच्या वतीने खेड तहसीलदार कचेरीच्या आवाराबाहेर धरणे आंदोलन करत आरोपींना कडक शिक्षेची मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी भीमशक्ती संघटनेचे जिल्हा अध्यक्ष विजय डोळस, तालुका अध्यक्ष अनिल जाधव, सचिव के.डी जाधव, किशोर डोळस, संजय गायकवाड, सिद्धरथ सरोदे, मंगेश जाधव, नितेश वाघमारे, मंगेश शिंदे, सिद्धरथ भालेराव, विकास पडवळ, भुजेग झोगडत, नागेश शिंदे आकाश घोडके आदी कार्यकर्ते नागरिक उपस्थित होते.

भीमशक्ती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित आरोपींना कोणतीही दया न दाखवता तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी ठाम भूमिका मांडली. तसेच अशा प्रकारच्या मानवतेला काळिमा फासणाऱ्या घटना महाराष्ट्रात वारंवार घडत असल्याने राज्य शासनाने विद्यमान कायद्यात बदल करून कठोर शिक्षेची तरतूद करणारा स्वतंत्र कायदा लागू करावा, व अशा गंभीर गुन्ह्यांवर आळा बसण्यासाठी कठोर आणि तातडीने शिक्षा होणे गरजेचे आहे. अन्यथा समाजात भीतीचे वातावरण निर्माण होऊन नागरिकांचा कायद्यावरील विश्वास कमी होण्याची शक्यता आहे. म्हणून अशा प्रकरणाची गंभीर दखल शासनाने घ्यावी.असे खेड तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

> नसरापूर आणि खालुंब्रे येथील निष्पाप चिमुकल्यांवर झालेले अत्याचार हे केवळ गुन्हे नाहीत, तर मानवतेचा क्रूर अपमान आहे. अशा नराधमांना जिवंत ठेवण्याचा कोणताही अधिकार नाही—त्यांना तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी, ही आमची ठाम आणि आक्रमक मागणी आहे. अशा विकृत प्रवृत्तीच्या गुन्हेगारांविरोधात शासनाने कोणतीही दया दाखवू नये. वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे समाजात भीती आणि संताप निर्माण झाला आहे. त्यामुळे अशा गुन्ह्यांसाठी तातडीने कठोर, निर्दय आणि धाकदायक कायदा लागू करून भविष्यात अशा प्रकारांना कायमचा आळा बसवणे गरजेचे आहे.
>
> **- विजय डोळस**
> **अध्यक्ष भीमशक्ती पुणे जिल्हा**

## विद्यार्थ्यांना घडली सिंगापूर शैक्षणिक सफर

पुणे : (स. गांवकरी)



विद्यार्थ्यांना जागतिक संस्कृती आणि आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देण्याच्या उद्देशाने 'स्वान' (Swan) फाऊंडेशनतर्फे आयोजित सिंगापूर शैक्षणिक व प्रेक्षणीय सहल उत्साहात पार पडली. पाच दिवसांच्या या अभ्यास दौऱ्यात विद्यार्थ्यांनी विविध आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्थळांना भेट देत ज्ञानासोबतच मनोरंजनाचाही आनंद लुटला. सिंगापूर शैक्षणिक सहल पूर्ण करून भारतात परतल्यानंतर विद्यार्थ्यांचा सत्कार एमएसआरडीसी चे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांच्या हस्ते कुसगाव (मिसिंग लिंक प्रकल्प परिसर) येथे करण्यात आला. स्वान सोशल स्टडी अँड रिसर्च फाऊंडेशन आणि डॉ. अनिलकुमार गायकवाड सामाजिक सेवकुंड यांच्या वतीने टेक्नसिंक इनोव्हेशन्स प्रा. लि. आणि चेन सेन्स इंडिया प्रा. लि. यांच्या आर्थिक सहकार्याने ग्रामीण महाराष्ट्रातील १३ गुणवंत विद्यार्थ्यांची या पूर्णतः प्रायोजित सहलीसाठी निवड करण्यात आली होती.

ही निवड 'डॉ. ए. बी. गायकवाड नॉलेज नेस्ट परीक्षा'द्वारे करण्यात आली. इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित या परीक्षेत राज्यभरातील ४,५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी फाउंडेशनचे उपाध्यक्ष अश्विनी कांबळे, सचिव विकास टाकळीकर, सीइओ प्रसादराजे भोपळे, तसेच टेक्सिंक चे अमन पाचगरे आणि चेअरमन गणेश लोरे उपस्थित होते.

# क्रीडा, शिस्त आणि आरोग्य यांचा समतोल साधा – प्रा. संजय धोपावकर

## डॉ.एन.जे.फार्मा रिदम-2026 गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगली मैफल

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ. एन.जे. पाऊलबुधे कॉलेज ऑफ फार्मसी येथे वार्षिक पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन 'फार्मा रिदम - 2026' हा बहुप्रतिक्षित कार्यक्रम माऊली सभागृहात अत्यंत दिमाखात आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, आकर्षक सांस्कृतिक सादरीकरणे आणि गुणवंतांचा सन्मान यामुळे संपूर्ण कार्यक्रमाला एक वेगळीच उंची प्राप्त झाली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे पेमराज सारडा कॉलेजचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संजय धोपावकर तसेच श्री. स्वामी समर्थ आयुर्वेद चिकित्सालयाचे वैद्य लक्ष्मीकांत कोर्टीकर उपस्थित होते. कार्यक्रमाला संस्थेचे उपाध्यक्ष श्री. रामभाऊ बुचकुल, सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार श्री. दादासाहेब भोईटे, तंत्रसंचालक डॉ.रेखाराणी खुराणा उपस्थित होते. शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून पारितोषिक वितरण करण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवीन ऊर्जा आणि प्रेरणा निर्माण झाली.

प्राचार्य डॉ. श्याम पांगा यांनी बी.फार्म व एम.फार्म विभागाचा वार्षिक अहवाल सादर करताना महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. तसेच प्राचार्या डॉ.अनुराधा चव्हाण यांनी डी.फार्म विभागाचा सविस्तर अहवाल मांडला. दोन्ही अहवालांतून संस्थेची शैक्षणिक गुणवत्ता, संशोधनवृत्ती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या प्रयत्नांचे दर्शन घडले.

प्रा.संजय धोपावकर यांनी सांगितले की, आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शैक्षणिक यश पुरेसे नसून शारीरिक तंदुरुस्ती तितकीच आवश्यक आहे. नियमित क्रीडा उपक्रमांमुळे शरीरातील हार्मोनल संतुलन राखले जाते, रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि व्यक्ती निरोगी जीवन जगू शकते. खेळामुळे मानसिक ताण कमी होतो, एकाग्रता वाढते आणि औषधांवरील अवलंबित्वही कमी होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच खेळालाही प्राधान्य देऊन संतुलित जीवनशैली अंगीकारावी, असे त्यांनी ठामपणे सांगितले. शिस्त, टीमवर्क आणि नेतृत्वगुण यांचा विकास क्रीडेमुळे कसा होतो यावर भर दिला.

खेळामुळे संघभावना वाढते, पराभव स्वीकारण्याची ताकद निर्माण होते आणि यशासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळते, असे त्यांनी स्पष्ट केले. जीवनातील प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी क्रीडेमधून मिळणारे हे गुण अत्यंत उपयुक्त ठरतात, असे त्यांनी नमूद केले. वैद्य लक्ष्मीकांत कोर्टीकर यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या नव्या पद्धतींबाबत मार्गदर्शन करताना गट-अभ्यासाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, एकत्रित अभ्यासामुळे विचारांची देवाणघेवाण होते, संकल्पना अधिक स्पष्ट होतात आणि ज्ञान अधिक सखोल बनते. तसेच आजच्या बदलत्या काळात आंतरशाखीय संशोधनाची गरज वाढत असून विविध क्षेत्रांमधील समन्वयातून नवनवीन संधी निर्माण होतात, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमास संस्थेअंतर्गत विविध शाळांच्या मुख्याध्यापिकाअंजली शिरसाठ, सौ.मीरा नराल, विजया नवले, अनिता सिद्धम उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख डॉ. वेणू कोला, डॉ. प्रसाद घुगरकर, डॉ. रोशनी सूर्यवंशी,डॉ. विजय तारडे, प्रा.स्वाती कडनोर यांनी मोलाचे योगदान दिले. तसेच सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख सहा. प्रा. पल्लवी कदम, सहा.प्रा. रुपाली माताडे यांनी उत्कृष्ट नियोजन करून कार्यक्रमाला यशस्वीतेची किनार दिली.

# थोडक्यात पण महत्वाचे

## पुणे मिसिंग लिंक मुळे महत्त्वाचा अडथळा दूर, नवीन वाढीचा मार्ग खुला



मुंबई (स. गांवकरी) : गुलाम झिया, आंतरराष्ट्रीय भागीदार, वरिष्ठ कार्यकारी संचालक – संशोधन, सल्लागार सेवा, पायाभूत सुविधा आणि मूल्यांकन, नाईट फ्रँक इंडिया यांनी सांगितले, "पुणे मिसिंग लिंकचे उद्घाटन हे भारतातील सर्वाधिक वर्दळीच्या वाहतूक मार्गांपैकी एका मार्गाचे महत्त्वपूर्ण उन्नयन दर्शवते. मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील हा 13.3 किमी वळणमार्ग दीर्घकाळापासून असलेला अडथळा दूर करतो, प्रवासाचा वेळ जवळपास 30 मिनिटांनी कमी करतो आणि धोकादायक घाट विभागातून वाहतूक वळवून सुरक्षितता व कार्यक्षमता दोन्ही सुधारतो. या प्रकल्पाचे प्रमाण 'टायगर व्हॅली'वरील भारतातील सर्वात लांब आणि उंच दोरआधारित पूलाच्या समावेशामुळे अधिक अधोरेखित होते." ते पुढे म्हणाले, "स्थावर मालमत्तेच्या दृष्टीकोनातून, अशा प्रकारची पायाभूत सुविधा ही बाजाराच्या उत्क्रांतीसाठी महत्त्वाची प्रेरक शक्ती ठरते. मुंबई आणि पुणे यांच्यातील सुधारलेली जोडणी या दोन शहरांमधील एकात्मता अधिक मजबूत करेल आणि या मार्गावर निवासी व व्यावसायिक विकासासाठी नवीन संधी निर्माण करेल. यामुळे गुंतवणुकीसाठी उपलब्ध क्षेत्राचा विस्तार होईल, खरेदीदारांचा आत्मविश्वास वाढेल आणि नवीन वाढीची केंद्रे उदयास येण्यास मदत होईल. गोदाम व्यवस्था आणि पुरवठा साखळी क्षेत्रालाही याचा मोठा फायदा होण्याची शक्यता आहे. जलद आणि अधिक विश्वासार्ह वाहतूक तसेच अवघड भूभागाचा टप्पा दूर झाल्यामुळे परतीचा कालावधी आणि कार्यकारी कार्यक्षमता सुधारेल. यामुळे उच्च दर्जाच्या गोदामांची मागणी वाढेल आणि मोठ्या साठवण केंद्रांच्या विकासाला चालना मिळेल, ज्यामुळे ई-वाणिज्य, उत्पादन आणि तृतीय-पक्ष पुरवठा साखळी सेवा यांसारख्या क्षेत्रांना समर्थन मिळेल."

## दुसऱ्या वर्षी मेटलाइफ टॉप २५ मध्ये

पुणे (स. गांवकरी) : जगातील अग्रगण्य वित्तीय सेवा कंपन्यांपैकी एक असलेल्या मेटलाइफनेजाहीर केले आहे की, २०२६ साठी भारतातील टॉप २५ सर्वोत्तम कार्यस्थळांमध्ये स्थानयादीत त्याचा समावेश झाला आहे. हा महत्त्वपूर्ण टप्पा मेटलाइफच्या उद्देशपूर्ण, सर्वसमावेशक कार्यस्थळ निर्माण करण्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे प्रतीक आहे, जिथेकर्मचारी स्वतःला महत्त्वपूर्ण, सक्षम आणि यशस्वी होण्यासाठी प्रेरित समजतात. ही मान्यता कंपनीच्या सातत्यपूर्ण, उच्च-विश्वास कर्मचारी अनुभव देण्याच्या वचनबद्धतेलाअधोरेखित करते. मजबूत पीपल प्रॅक्टिसेस आणि काळजी, सहयोग व प्रगतीवर आधारितसंस्कृतीद्वारे मेटलाइफ आपल्या कर्मचाऱ्यांसाठी विश्वासार्ह आणि प्रेरणादायी कार्यस्थळनिर्माण करत आहे. "भारताच्या बीएफएसाय क्षेत्रातील बेस्ट वर्कप्लेस २०२६ मध्ये आमचा समावेश झाल्याचाआम्हाला अभिमान आहे," असे मेटलाइफ ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरचे व्यवस्थापकीय संचालक अशिष के. श्रीवास्तव यांनी सांगितले. "ही कामगिरीसर्वसमावेशक आणि सहायक कार्यस्थळ निर्माण करण्याच्या आमच्या अखंड वचनबद्धतेचेप्रतीक आहे, जिथे आमचे कर्मचारी प्रगती करू शकतात. मेटलाइफमध्ये आम्ही आमच्याटीम्सना सक्षम बनवणारी आणि अर्थपूर्ण परिणाम साधणारी संस्कृती जोपासण्यावर लक्षकेंद्रित करतो." ग्रेट प्लेस टू वर्क ® संस्था गेल्या तीन दशकांहून अधिक काळ विविध संस्थांमधीलकर्मचारी अनुभव आणि पीपल प्रॅक्टिसेस यांचा अभ्यास करत आहे. कर्मचारी अभिप्रायआणि संस्कृतीचे ऑडिट यांचा समावेश असलेल्या कठोर पद्धतीद्वारे ती संस्थांना उच्च-विश्वास कार्यस्थळ निर्माण व टिकवून ठेवण्यास मदत करते. दरवर्षी १५० हून अधिकदेशांतील लाखो कर्मचारी या मूल्यमापनात सहभागी होतात, ज्यामुळे संस्थांना त्यांच्यासंस्कृतीचे बेंचमार्किंग करता येते आणि पीपल प्रॅक्टिसेस अधिक मजबूत करता येतात. ही सलग दुसरी वेळ आहे की मेटलाइफला या प्रतिष्ठित यादीत स्थान मिळाले आहे. याशिवाय, मेटलाइफला जगभरातील 33 बाजारपेठांमध्ये ग्रेट प्लेस टू वर्क प्रमाणपत्रमिळाले असून, फॉर्च्युन वर्ल्डस २५ बेस्ट वर्कप्लेसTM 2025 यादीत दहाव्या क्रमांकावरस्थान मिळाले आहे. या कामगिरी कंपनीच्या कर्मचारी, ग्राहक आणि समुदाय यांच्याप्रतीअसलेल्या अखंड वचनबद्धतेचे प्रतीक आहेत.

## आयडीबीआय बँके तर्फे ४ थ्या तिमाहीचे वित्तीय निष्कर्श जाहीर

पुणे (स. गांवकरी) : आयडीबीआय बँके तर्फे आज त्यांच्या आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या निष्कर्शांची घोषणा केली. वर्ष २६ च्या तिसऱ्या तिमाहीत निव्वळ नफा हा रु.१,९३५ कोटी झाला. आर्थिक वर्ष २६च्या ४थ्या तिमाहीत कार्यातून होणारा नफा हा रु. १,९४३ कोटींवर गेला. एनआयएम ची टक्केवारी ही ४.१५ टक्के झाली, वार्षिक तुलनेत १५ बीपीएस ची वाढ आहे. सीआरएआर ची टक्केवारी २६.६५ टक्के असून वार्षिक तुलनेत १६९ बीपीएसची वाढ झाली. रिटर्न ऑन ॲसेट्स (आरओए)ची आकडेवारी २.२७ टक्के, वार्षिक तुलनेत २९ बीपीएसची वाढ झाली आहे. निव्वळ एनपीए चे गुणोत्तर हे ३१ मार्च २०२६ रोजी ०.१५ टक्के होते, ३१ मार्च २०२६ रोजी एनपीए च्या गुणोत्तरात सुधारणा होऊन २.३२ टक्के झाली, जी ३१ मार्च २०२५ रोजी २.९८ टक्के होती. सप्टेंबर २०२३ पासून ९९ टक्क्यांचे सातत्य राखत पीसीआर ची टक्केवारी ही ३१ मार्च २०२६ रोजी ही ९९.३९ टक्के झाली.

## वनप्लसतर्फे वनप्लस पॅड ४ सादर




पुणे (स. गांवकरी) : जागतिक तंत्रज्ञान ब्रँड वनप्लस ने आज आपला नवीन फ्लॅगशिप टॅबलेट वनप्लस पॅड ४ सादर केला आहे. हा टॅबलेट प्रॉडक्टिव्हिटी, क्रिएटिव्हिटी आणि एंटरटेनमेंटला नवे आयाम देण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. स्नॅपड्रॅगन® ८ एलिट जन ५ प्लॅटफॉर्म, ३३.५३ से.मी (13.2-इंच) ३.४के डिस्प्ले, १३,३८० एमएएच ची प्रचंड बॅटरी आणि फ्लॅगशिप प्रॉडक्टिव्हिटी टूल्स यामुळे वनप्लस पॅड ४ पोर्टेबल फॉर्ममध्ये शक्तिशाली पीसी लेव्हल परफॉर्मन्स देतो. प्रोफेशनल्स डिझाइन केलेले, क्रिएटर्स आणि मल्टीटास्कर्ससाठी खास डिझाइन केलेला हा टॅबलेट टॉप-टियर हार्डवेअर आणि स्मार्ट सॉफ्टवेअर अनुभव एकत्र आणतो. यात १४४ हर्ट्झ रिफ्रेश रेट, स्पॅशियल ऑडिओसह आठ स्पीकर्स, ८० वॉट सुपरव्हूक फास्ट चार्जिंग आणि ॲडव्हान्स्ड कूलिंग दिले आहे, ज्यामुळे सतत स्मूथ परफॉर्मन्स मिळतो. वनप्लस पॅड ४ ची किंमत ५४,९९९ रुपये पासून सुरू होते (बँक ऑफर्ससह) आणि विक्री ५ मे २०२६ पासून सुरू होईल. वनप्लस पॅड ४ च्या कोअरमध्ये स्नॅपड्रॅगन® ८ एलिट जन ५ प्रोसेसर असून त्यासोबत १२ जीबी पर्यंत एलपीडीडीआर५एक्स रॅम आणि ५१२ पर्यंत यूएफएस ४.१ स्टोरेज दिले आहे. त्यामुळे डिमांडिंग टास्क्समध्येही फास्ट आणि रिस्पॉन्सिव्ह परफॉर्मन्स मिळतो. वनप्लस पॅड ४ मध्ये ३३. ५३ से.मी (13.2-इंच) ३.४K अल्ट्रा-क्लिअर डिस्प्ले आहे, ज्यात ३१५ पीपीआय , डॉल्बी व्हिजन, १२ बिट कलर डेप्थ, प्रोफेशनल-ग्रेड कलर ॲक्युरसी आणि १००० निट्स एचबीएम ब्राइटनेस आहे. त्यामुळे शार्प आणि व्हायब्रंट व्हिज्युअल्स मिळतात. १४४ हर्ट्झ रिफ्रेश रेट आणि ५४० हर्ट्झ टच सॅम्पलिंग रेटमुळे स्क्रोलिंग फ्लुइड होते आणि टच इंटरॅक्शन अत्यंत रिस्पॉन्सिव्ह असतात. ७: ५ रीडफिट रेशो आणि ८९.४ टक्के स्क्रीन-टू-बॉडी रेशोमुळे प्रॉडक्टिव्हिटी आणि रीडिंग कम्फर्ट वाढतो.

# सिने आर्टिस्ट वेलफेअर ट्रस्टचे कार्य कौतुकास्पद : रविंद्र चव्हाण

पुणे : (स. गांवकरी)




अभिनय क्षेत्रातील दिग्गज कलाकारांना आपण सिनेमाच्या रुपेरी पडद्यावर पाहतो. या क्षेत्रात मिळणारा पैसा व माया यांची चर्चा आपण ऐकतो. पण प्रसिद्धीच्या पडद्याबाहेर गेल्यावर त्या कलाकारांच्या आयुष्यामध्ये किती दुःख असते ते आपल्याला कधीही दिसत नाही. अशा या जेष्ठ कलाकारांसाठी दिलीप कुमार, सुनील दत्त, मिथुन चक्रवर्ती, जॉनी लिव्हर, आशा पारेख यांसारख्या कलाकारांनी एकत्र येऊन जेष्ठ कलाकारांचे दुःख, त्यांच्या गरजा, त्यांचे आजारपण यांसारख्या समस्या सोडवण्यासाठी CAWT सारखा एक मंच तयार केला असून या संस्थेतर्फे केले जाणारे काम अतिशय कौतुकास्पद आहे, असे वक्तव्य भाजपचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आज मुंबईत केले. सिने आर्टिस्ट वेलफेअर ट्रस्ट (CAWT) आणि सिने अँड टीव्ही आर्टिस्ट असोसिएशनच्या वतीने CAWT च्या स्थापनेत आणि CINTAA - CAWT टॉवरच्या उभारणीत ज्या विश्वस्थ कलाकारांनी आपले अमूल्य योगदान दिले, त्यामध्ये प्रामुख्याने सुप्रसिद्ध अभिनेते दिलीप कुमार, सुनील दत्त, मिथुन चक्रवर्ती, जॉनी लिव्हर, आशा पारेख, अमरीश पुरी, अमजद खान, चंद्रशेखर वैद्य, दारासिंह या कलाकारांचा सन्मान करण्यासाठी त्या कलाकारांचे फोटो आणि माहिती देणाऱ्या फलकाचे उदघाटन आज भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळेस ते बोलत होते.

रविंद्र चव्हाण पुढे म्हणाले की, अभिनय क्षेत्रातील प्रत्येक कलाकाराचा एक प्रसिद्धीचा काळ असतो. तो चांगला काळ ओसरला कि सरत्या काळात त्या कलाकारांकडे कुणी पाहत नाही. त्यांची कुणी चौकशी करत नाहीत. असे जवळपास ९ ते १० हजार कलाकार सध्या अभिनय क्षेत्रात आहेत. अशा कलाकारांचे दैनंदिन जीवन अतिशय हलाखीचे असते. यामध्ये अभिनय क्षेत्रात काम करणारे इतर कामगार यांची संख्या देखील मोठी आहे. याना सामाजिक जीवनात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते, अशी माहिती मला CAWT च्या अध्यक्षा प्रीती सप्रू यांनी मला आज दिली. या सर्व समस्यांचे निराकरण करण्याबाबत मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्याशी चर्चा करून लवकरात लवकर सोडवण्याचा प्रयत्न करणार आहे.

तसेच CAWT ला जेष्ठ कलाकारांकरिता मी कोकणातील केसरी, सावंतवाडी येथील माझी स्वतःची एक एकर जागा देण्यास तयार आहे, असे रविंद्र चव्हाण म्हणाले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी रविंद्र चव्हाण यांच्या सोबत जेष्ठ अभिनेत्री व CAWT च्या अध्यक्षा प्रीती सप्रू, ट्रस्टच्या सचिव अभिनेत्री संभावना सेठ, संस्थेचे खजिनदार अभिनेते दीपक पराशर, बॉलिवूड अभिनेते राजपाल यादव, मनोज जोशी, मुकेश ऋषी, आयुब खान, अभिनेत्री कुनिका आणि सिने व टीव्ही क्षेत्रातील अनेक कलाकार उपस्थित होते.

# सोनालिका : १६,२२३ ट्रॅक्टर विक्रीसह ३५.६% वाढ

पुणे : (स. गांवकरी)



भारतातील नंबर १ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या सोनालिका ट्रॅक्टर्सने एप्रिल महिन्यात आजपर्यंतची सर्वाधिक एकूण १६,२२३ ट्रॅक्टरची विक्री करून आर्थिक वर्ष २०२७ च्या प्रवासाची जोरदार आणि धोरणात्मक सुरुवात केली आहे. या उद्योगातील बाजारपेठेचा सर्वाधिक वाटा मिळविणाऱ्यांमध्ये तिने प्रमुख स्थान मिळवले आहे. यासाठी तिच्या स्तंभित करेल अशा ३५.६ % एकंदर वाढीची चालना मिळाली असून तिने उद्योगाच्या २७% (अंदाजे) वाढीच्या कामगिरीलाही मागे टाकले आहे. कंपनीची आपल्या ३० व्या वर्षात 'जीतने का दम' मिळवून देण्याच्या शेतकरी-प्रथम तत्त्वज्ञानावर निर्भरता कायम असून अधिक शेतकरी कार्यक्षमता आणि उत्पन्न क्षमतेसाठी प्रगत कृषी-नवकल्पनांचा तिला आधार मिळाला आहे. अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन आणि जीएसटीच्या दरात कपात झाल्यानंतर वाढत्या यांत्रिकीकरणामुळे, भारताच्या शेती क्षेत्राच्या वाढीच्या गाथेचा पुढील टप्पा तंत्रज्ञानावर आधारित उत्पादन पोर्टफोलिओ आणि अंमलबजावणीचा अथक वेग यांवर अवलंबून असेल. हवामानातील अस्थिरता आणि वाढत्या कामगिरीच्या अपेक्षांमुळे ग्रामीण भागातील आकांक्षा आकाराला येत आहेत. अशा वेळेस सोनालिका १९ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांसाठी एक विश्वासार्ह भागीदार म्हणून उभी आहे. आपले उच्च गुणवत्तेचे ट्रॅक्टर सर्व प्रकारच्या वापरांमध्ये अखंडपणे कामगिरी करतील याची हमी ती देते.

# गझल-गीतांतून उलगडली महामानवांची महती

पुणे : (स. गांवकरी)



बुद्ध पौर्णिमेनिमित्त 'विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक समिती'तर्फे आयोजित 'बुद्ध धम्म संध्या' कार्यक्रमात गझल व गीतांच्या माध्यमातून तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रभावी मांडणी करण्यात आली. पुणे विद्यापीठातील तथागत गौतम बुद्ध विहार येथे झालेल्या या कार्यक्रमाला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. "वंदितो तुला मी गौतमा", "मुक्ती दिन हा मानवतेचा", "सांगा बहुजनास आता संपला वनवास", "चंदन वृक्ष समान होता भीमराव" अशा गीतांमधून कलाकारांनी महामानवांच्या कार्याचा आणि मानवतेच्या संदेशाचा सुरेल आविष्कार सादर केला. ज्येष्ठ गझल गायक अशोक गायकवाड यांनी आपल्या सहकाऱ्यांसह गीत-गझलांच्या माध्यमातून बुद्धांच्या करुणा व आंबेडकरांच्या समानतेच्या विचारांचा प्रभावी संदेश दिला. कार्यक्रमाची सुरुवात "तथागत तुझा धम्म आचरणी" या गीताने झाली. त्यानंतर "हृदयी वसे माझ्या बुद्ध पिंपळाचा पार", "भीमा तुझ्या कृपेने जगणे झाले सोपे", "अंधारमय नभात उजळून भीम गेला" यांसारख्या गीतांनी वातावरण भारावून गेले. "भीमा सारखा हिरा अलौकिक जगात दुसरा कोणीच नाही" या ओळींनी रसिकांची दाद मिळवली. या कार्यक्रमाला समितीचे अध्यक्ष व उपमहापौर परशुराम वाडेकर, माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, संत गाडगेबाबा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण, नगरसेवक सनी निम्हण आदी मान्यवर उपस्थित होते.

संगीतसाथ निखिल वाघमारे (तबला), श्याम चंदनशिव (ढोलक), अवधूत धायगुडे (साईड रिदम), अमोल मांढरे (कीबोर्ड), अझरुद्दीन शेख (बासरी) व रुपेश मोरे (हार्मोनियम) यांनी केली. धम्मचारिणी गुणमेघा यांनी निवेदन, तर दीपक म्हस्के यांनी सूत्रसंचालन केले. महोत्सवाच्या निमित्ताने अशोक गायकवाड म्हणाले की, "महाराष्ट्रात अनेक राजकारणी आहेत; मात्र तथागत गौतम बुद्धांविषयी प्रेम, करुणा आणि आस्था जपणारे परशुराम वाडेकर यांचे कार्य वेगळेपणाने उठून दिसते.

या सांस्कृतिक महोत्सवातून बुद्धांच्या विचारांचा वारसा आणि डॉ. आंबेडकरांचा समानतेचा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण काम होत आहे."

# एथर एनर्जीची विक्रमी झेप; तिमाहीत ८३,४१८ वाहनांची विक्री

पुणे : (स. गांवकरी)



वार्षिक विक्रीत ६९ टक्के वाढ

एथर एनर्जी या आघाडीच्या विद्युत दुचाकी उत्पादकाने आर्थिक वर्ष 2026 मध्ये विक्री, उत्पन्न आणि बाजारपेठेतील हिस्सा या सर्वच आघाड्यांवर भरीव कामगिरी नोंदवली. कंपनीने वर्षभरात 2,62,942 वाहनांची विक्री करत 69 टक्के वाढ साधली, तर चौथ्या तिमाहीत 83,418 वाहनांची विक्री करून 76 टक्के वाढ नोंदवली. नफ्यापूर्वीची कमाई (ईबीआयटीडीए) मध्येही मोठी सुधारणा झाली आहे.

आर्थिक वर्ष 2026 मध्ये कंपनीचे एकूण उत्पन्न ₹3,823 कोटींवर पोहोचले, जे मागील वर्षाच्या तुलनेत 66 टक्क्यांनी अधिक आहे. समायोजित एकूण नफा ₹925 कोटींवर पोहोचत 116 टक्के वाढ नोंदवली, तर नफ्याचे प्रमाण 24 टक्क्यांपर्यंत सुधारले. तोटा लक्षणीयरीत्या कमी होऊन ₹257 कोटींवर आला असून कामकाजातील कार्यक्षमतेत वाढ झाल्याचे दिसून आले.

कंपनीच्या वाढीमागे भौगोलिक विस्तार, झपाट्याने वाढलेले विक्री जाळे आणि एथर रिट्झा या कुटुंबासाठी उपयुक्त असलेल्या स्कूटरची प्रभावी कामगिरी हे प्रमुख घटक ठरले.

वर्षअखेरपर्यंत एथरने आपले अनुभव केंद्र 351 वरून 700 पर्यंत वाढवले, तर सेवा केंद्रांची संख्या 548 वर पोहोचली. तसेच 6,000 हून अधिक जलद चार्जिंग केंद्रांमुळे कंपनीचे जाळे देशभर मजबूत झाले आहे.


बाजारपेठेतील हिस्साही लक्षणीयरीत्या वाढला असून मध्य भारतात तो 9.5 टक्क्यांवरून 17.3 टक्क्यांपर्यंत गेला, तर उर्वरित भारतात 6.5 टक्क्यांवरून 12.1 टक्क्यांपर्यंत वाढ झाली. दक्षिण भारतात कंपनीने 23.5 टक्के हिस्सा राखत आघाडी कायम ठेवली.

कंपनीचे सहसंस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी तरुण मेहता यांनी सांगितले की, उत्पादनाधारित वाढ, मजबूत वितरण जाळे आणि नव्या ग्राहकवर्गामुळे कंपनीला मोठी गती मिळाली आहे. नवीन स्कूटर व्यासपीठ आणि उत्पादन क्षमतेतील गुंतवणूक यामुळे पुढील काळातही ही वाढ कायम राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

चौथ्या तिमाहीत कंपनीचे उत्पन्न ₹1,214 कोटींवर पोहोचले, जे वार्षिक तुलनेत 76 टक्के वाढ आहे. समायोजित एकूण नफा 25 टक्क्यांपर्यंत सुधारला, तर तोटा घटून ₹30 कोटींवर आला. वाढती विक्री आणि खर्च नियंत्रणामुळे कंपनीच्या आर्थिक स्थितीत सातत्याने सुधारणा होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# डिजिटल लॉकर सुविधा असलेली ॲक्सिस बँकेची पहिली शाखा

पुणे : (स. गांवकरी)




भारतातील खासगी क्षेत्रातील सर्वात मोठ्या बँकांपैकी एक असलेल्या ॲक्सिस बँकेने नवी दिल्ली येथील कॅपिटल ग्रीन, डीएलएफ मिडटाउन प्लाझा येथे डिजिटल लॉकर सेवांवर लक्ष केंद्रित करणारी आपली पहिली शाखा आज सुरू केली. प्रगत स्वयंचलित प्रणाली (ऑटोमेशन), उत्कृष्ट सुरक्षा व्यवस्था आणि अत्याधुनिक लॉकर सेवांच्या माध्यमातून ग्राहकांना एक वेगळा तसेच वैशिष्ट्यपूर्ण अनुभव देऊन, सुरक्षित बँकिंगची संकल्पना नव्याने साकार करण्याच्या बँकेच्या प्रयत्नांमधील ही नवीन शाखा म्हणजे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

या शाखेचे उद्घाटन श्री. एम. नागराजू (IAS), सचिव, वित्तीय सेवा विभाग (DFS), वित्त मंत्रालय, भारत सरकार; आणि श्री. अशोक त्यागी, व्यवस्थापकीय संचालक, डीएलएफ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बँकेचे वरिष्ठ नेतृत्व श्री. अमिताभ चौधरी व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आणि श्री. मुनीश शारदा कार्यकारी संचालक यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

भारतामध्ये, विशेषतः दाट लोकवस्ती असलेल्या शहरी केंद्रांमध्ये, सेफ-डिपॉझिट लॉकरच्या उपलब्धतेमध्ये तफावत दिसते आहे. उद्योग क्षेत्राच्या अंदाजानुसार, 2030 पर्यंत सुमारे 6 कोटी सधन भारतीयांना बँक लॉकरची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. सध्या उपलब्ध असलेल्या लॉकरची संख्या केवळ 60 लाख इतकीच आहे.

# लवकर निदान आणि वेळेवर उपचार हर्नियाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी महत्त्वाचे

पुणे : (स. गांवकरी)





> निकोप वजन राखणे, जास्त ताण टाळणे आणि सततचा खोकला असल्यास त्यावर उपचार करणे यामुळे धोका कमी होऊ शकतो. जागरूकता वाढवणे, लवकर निदान आणि वेळेवर उपचार हे प्रभावी हर्निया व्यवस्थापन आणि दीर्घकालीन आरोग्यासाठी महत्त्वाचे घटक आहेत.

हर्निया ही एक सामान्य पण अनेकदा दुर्लक्षित केली जाणारी समस्या आहे, ज्याच्यावर वेळेत उपचार न केल्यास जीवनाच्या गुणवत्तेवर लक्षणीय परिणाम होऊ शकतो. ही अवस्था तेव्हा निर्माण होते जेव्हा एखादा अवयव किंवा ऊतक आसपासच्या स्नायूमधील कमकुवत भागातून बाहेर ढकलले जाते. जड वजन उचलणे, दीर्घकालीन खोकला, स्थूलता आणि मागील शस्त्रक्रिया अशा बाबी याचा धोका वाढवू शकतात.

जागतिक आरोग्य संघटनेनुसार, हर्नियासह उपचार न केलेल्या शस्त्रक्रियेसंबंधित आजारांमुळे जागतिक रोगांच्या भारात लक्षणीय वाढ होते. नॅशनल सेंटर फॉर बायोटेक्नॉलॉजी इन्फॉर्मेशनच्या आकडेवारीनुसार, सुमारे २७% पुरुषांना आणि ३% महिलांना आयुष्यात कधी ना कधी इन्ग्वायनल हर्नियाचा त्रास होतो. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय देखील गुंतागुंत टाळण्यासाठी लवकर निदान आणि वेळेवर शस्त्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित करते.

हर्निया अनेकदा जांघेत, पोटात किंवा पूर्वीच्या शस्त्रक्रियेच्या जागेजवळ लहान, वेदनारहित सूज म्हणून सुरू होतो, त्यामुळे अनेकजण त्याकडे दुर्लक्ष करतात. मात्र सुरुवातीची लक्षणे म्हणजे ओढल्यासारखी भावना, सौम्य अस्वस्थता, बराच वेळ उभे राहिल्यानंतर दाब जाणवणे आणि पोटात जडपणा किंवा फुगल्यासारखे वाटणे अशी असू शकतात. ही लक्षणे लवकर ओळखून वैद्यकीय सल्ला घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

निदान सामान्यतः शारीरिक तपासणीद्वारे सोपे असते, तर काही निवडक प्रकरणांमध्ये इमेजिंगचा वापर केला जातो. लवकर निदान झाल्यास उपचार अधिक सोपे आणि प्रभावी ठरतात.

"माझ्या प्रॅक्टिसमध्ये, मी अनेक रुग्णांवर उपचार केले आहेत ज्यांना सुरुवातीला फक्त एक छोटी सूज जाणवली होती. उपचार न केल्यास ही अवस्था कशी वाढू शकते हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. वेळेवर हस्तक्षेप केल्यास, प्रक्रिया किती सोपी आहे आणि दुरुस्तीनंतर सूज व अस्वस्थता यांसारखी लक्षणे किती लवकर सुधारतात हे पाहून रुग्णांना दिलासा मिळतो," असे डॉ. परमेश्वर भाम्ब्रूले यांनी सांगितले.

उपचार उशिरा केल्यास इन्कारसिरेशन म्हणजेच ऊतक अडकून पडणे किंवा स्ट्रँग्युलेशन, ज्यात आपत्कालीन उपचारांची गरज असलेली गंभीर अवस्था होणे यांसारख्या गुंतागुंती निर्माण होऊ शकतात.

"मी माझ्या रुग्णांना नेहमी सांगतो की हर्नियाचा उपचार हा केवळ दिसणारी सूज दुरुस्त करण्यापुरता मर्यादित नसून, गुंतागुंत टाळणे आणि एकूण जीवनमान सुधारण्याबद्दलही आहे. वेळेवर उपचारानंतर अनेक रुग्णांना हालचालीत सुधारणा, झोपेत सुधारणा आणि दैनंदिन दिनक्रमात लवकर परतण्याचा अनुभव येतो," असे डॉ. विनायक क्षीरसागर यांनी सांगितले.

हर्निया उपचारपद्धतीतील प्रगतीमुळे उपचार अधिक सुरक्षित आणि कार्यक्षम झाले आहेत. अतिशय कमी हानिकारक तंत्रांमध्ये लहान चिरे दिले जातात, ज्यामुळे वेदना कमी होतात, बरे होण्याचा कालावधी कमी होतो आणि रुग्णालयात कमी दिवस राहावे लागतात.

प्रभावित भाग मजबूत करण्यासाठी सर्जिकल मेशचा वापर केल्याने पुन्हा होण्याचा धोका कमी होतो आणि रुग्ण दैनंदिन कामे पुन्हा आरामात सुरू करू शकतात.

# थोडक्यात पण महत्वाचे



## माणसाच्या जीवनात यश हा परमात्म्याचा गुण : महंत रामगिरीजी महाराज

वडाळा महादेव (स. गांवकरी) : श्रीरामपूर तालुक्यातील उंदिरगाव येथे सद्गुरु गंगागिरीजी महाराज यांच्या कृपेने व ब्रह्मलीन नारायणगिरी महाराज यांच्या आशीर्वादाने, महंत रामगिरी महाराज तसेच परमपूज्य भास्करगिरी महाराज यांच्या अधिपत्याखाली अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व कीर्तन महोत्सव मोठ्या भक्तिभावाने संपन्न झाला. दिनांक २४ एप्रिल ते १ मे २०२६ या कालावधीत स्व. भास्करराव पाटील गलांडे विद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या या अखंड हरिनाम सप्ताहात राज्यातील नामवंत कीर्तनकारांनी कीर्तन सेवा सादर केली. काल्याच्या कीर्तनात महंत रामगिरी महाराजांचे विचार काल्याच्या कीर्तनात मार्गदर्शन करताना महंत रामगिरी महाराज म्हणाले, "मन मोकळे करण्याचा मार्ग म्हणजे मंदिर आहे. जीवनामध्ये परमार्थातलं प्रेम निरपेक्ष असतं. मुलाला जसे त्याचे सर्वस्व आई असते, तसे भक्तांच्या जीवनात परमार्थ असतो. माणसाच्या जीवनात यश हा परमात्म्याचा गुण आहे." असे अनेक आध्यात्मिक दाखले देऊन महाराजांनी भाविकांना मंत्रमुग्ध केले. शिवस्मारक उभारण्याचे आवाहन यावेळी उंदिरगाव ग्रामस्थांनी गावात भव्य शिवस्मारक व्हावे अशी इच्छा महंत रामगिरी महाराजांकडे व्यक्त केली. महाराजांनी या मागणीला पाठिंबा दर्शवत, लवकरात लवकर भव्य शिवस्मारक उभारावे असे आवाहन गावकऱ्यांना केले. महंत रामगिरी महाराजांच्या शुभहस्ते दहीहंडी फोडून कीर्तन महोत्सवाचा समारोप करण्यात आला. यावेळी उंदिरगावसह पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी कीर्तनाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## किसान सभेचे पुणे जिल्हाध्यक्ष डॉ. अमोल वाघमारे

■ शेतकरी, शेतमजूर, आदिवासी, दलित व महिला घटकांच्या प्रश्नांसाठी लोकशाही मार्गाने व्यापक आंदोलन

मंचर (स. गांवकरी) : शेतकरी, शेतमजूर, आदिवासी, दलित व महिला घटकांच्या प्रश्नांसाठी लोकशाही मार्गाने व्यापक आंदोलन उभे करण्याचे आवाहन किसान सभेचे पुणे जिल्हाध्यक्ष डॉ.अमोल वाघमारे यांनी केले.अखिल भारतीय किसान सभा, आंबेगाव तालुका समितीचे सहावे त्रैवार्षिक अधिवेशन फलोदे येथील शहीद राजगुरू ग्रंथालयात उत्साहात पार पडले.शहीद स्मारकास अभिवादन कॉ.अशोक पेकारी यांच्या हस्ते करण्यात आले.अधिवेशनाचे उद्घाटन किसान सभा पुणे जिल्हा समितीचे उपाध्यक्ष कॉ.राजू घोडे यांच्या हस्ते झाले.प्रारंभी तालुका सचिव रामदास लोहकरे यांनी मागील तीन वर्षांचा अहवाल सादर केला.त्यावर चर्चा होऊन अहवालास एकमताने मंजुरी देण्यात आली.अधिवेशनास जनवादी महिला संघटनेच्या तालुका अध्यक्ष भिमाबाई लोहकरे तसेच जनवादी युवा संघटनेचे नेते सतीश लोहकरे उपस्थित होते.त्यांनी अधिवेशनाला शुभेच्छा देत संघटनात्मक बळकटीवर भर दिला.पुढील तीन वर्षांसाठी विविध प्रश्नांवर ठराव मंजूर करण्यात आले.यामध्ये हिरडा व दुधाला हमीभाव, वाडी-वस्त्यांना पक्के रस्ते,वनहक्क व पेसा कायद्याची अंमलबजावणी तसेच निराधार पेन्शनवाढ यांसारख्या मुद्द्यांचा समावेश होता.सूत्रसंचालन अशोक जोशी यांनी तर आभार मारुती इष्टे यांनी मानले.

## बारावी निकाल ९५.०७%; तिन्ही शाखांमध्ये उल्लेखनीय यश

मंचर (स. गांवकरी) : मंचर ता.आंबेगाव येथील अण्णासाहेब आवटे महाविद्यालयाने इयत्ता बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे.महाविद्यालयाचा एकूण निकाल ९५.०७ टक्के लागला असून कला, वाणिज्य आणि विज्ञान या तिन्ही शाखांमध्ये विद्यार्थ्यांनी लक्षणीय कामगिरी केली आहे.अशी माहिती प्राचार्य डॉ.एन. एस.गायकवाड यांनी दिली. कला शाखेचा निकाल ९६.०३ टक्के लागला.या शाखेत साक्षी रॉय हिने (८१.६६%) मिळवत प्रथम क्रमांक पटकावला.तुषार शिंदे (८१.३३%) द्वितीय, तर ओंकार लांघी (८०.६७%) तृतीय क्रमांकावर राहिला. वाणिज्य शाखेत मराठी माध्यमाचा निकाल समाधानकारक लागला. संस्कृती इंदोरे हिने (७६.६७%) मिळवत प्रथम क्रमांक मिळवला.वर्षा दिघे (७३.६७%) द्वितीय, तर सानिका पवार (७३.३३%) तृतीय आली. इंग्रजी माध्यमात साई झुंजारराव (७६.३३%) प्रथम, आयेशा पठाण (७४.६७%) द्वितीय आणि जानवी टावरे (६७.६७%) तृतीय ठरली.विज्ञान शाखेनेही उज्ज्वल निकाल नोंदवत ९७.८५ टक्के यश मिळवले.या शाखेत अलिझा शेख (७७.६७%) प्रथम क्रमांकावर राहिली.श्रिया बंडगर आणि श्रावणी एरंडे यांनी समान (७२.६७%) मिळवत संयुक्त द्वितीय क्रमांक मिळवला. सुमित बोऱ्हाडे (७०.६७%) तृतीय आला.या यशाबद्दल प्राचार्य डॉ.एन.एस.गायकवाड यांनी ज्युनिअर विभागाचे उपप्राचार्य प्रा.अविनाश झावरे, सहकारी शिक्षकवृंद, विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन केले.



## किशोर देसाई फाउंडेशनचा उपक्रम; ॲम्ब्युलन्स चे लोकार्पण

पुणे (स. गांवकरी) : किशोर पंप्सचे अध्यक्ष श्री. किशोर देसाई यांनी 'किशोर देसाई फाउंडेशन'च्या माध्यमातून फलटण परिसरातील नागरिकांच्या सेवेसाठी ॲम्ब्युलन्स दान केली. या ॲम्ब्युलन्सचे लोकार्पण पुण्यात प्रख्यात वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. सुहृद सरदेसाई यांच्या हस्ते पार पडले. यावेळी किशोर देसाई, भाग्यश्री देसाई, सिद्धार्थ देसाई आणि अमृता देसाई उपस्थित होते. किशोर देसाई फाउंडेशनच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा व शुद्धीकरण तसेच सौरऊर्जा या क्षेत्रांत विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. यावेळी बोलताना डॉ. सरदेसाई म्हणाले, "आपत्कालीन वैद्यकीय परिस्थितीत प्रत्येक क्षण अत्यंत महत्त्वाचा असतो. फलटणसारख्या ग्रामीण भागातील नागरिकांसाठी ही ॲम्ब्युलन्स अत्यंत उपयुक्त ठरेल, असा आमचा विश्वास आहे." ही ॲम्ब्युलन्स आपत्कालीन परिस्थितीत फलटणच्या २५० किमी परिसरात कार्यरत राहणार आहे.

# आळंदी येथे "विश्वमंगल मराठी फाउंडेशन"चा दिमाखदार शुभारंभ

## आमदार सुभाष बापू देशमुख यांच्या नेतृत्वाखाली भव्य शुभारंभ सोहळा संपन्न

पिंपरी-चिंचवड : (स. गांवकरी)

आळंदी येथील फ्रुटवाले धर्मशाळा सभागृहात दिनांक १ मे २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात "विश्वमंगल मराठी फाउंडेशन" चा भव्य शुभारंभ सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील विविध भागांतून तसेच देश-विदेशातून अनेक उद्योजक व प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या शुभारंभ सोहळ्यास माननीय आमदार श्री. सुभाष बापू देशमुख (सोलापूर), प्रख्यात वक्ते व ज्येष्ठ निरुपणकार श्री. विवेकजी घळसासी, तसेच राज्यभरातील अनेक मान्यवर नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून जागतिक स्तरावरील नामांकित उद्योजक श्री. संजय वायाळ (ईशवेद बायोटेक प्रा. लि.), डॉ. उदय भोसले (वैज्ञानिक, लंडन) आणि श्री. आप्पासाहेब कोंढारे (सुवर्ण व्यावसायिक, दुबई) हे विशेषतः परदेशातून उपस्थित राहिले होते. कार्यक्रमाची सुरुवात आळंदी येथे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचे महापूजन करून करण्यात आली. मंदिर समितीच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर वारकऱ्यांच्या उपस्थितीत माऊलींच्या मंदिरापासून सभागृहापर्यंत दिंडी काढण्यात आली. यानंतर सभागृहात मुख्य कार्यक्रमास प्रारंभ झाला. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले तसेच "विश्वमंगल मराठी फाउंडेशन"च्या लोगो व वेबसाईटचे अनावरण करण्यात आले. या सोहळ्यामुळे कार्यक्रमात विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. प्रास्ताविक भाषणात माननीय आमदार श्री. सुभाष बापू देशमुख यांनी फाउंडेशनची स्थापना करण्यामागील प्रेरणा स्पष्ट केली. मराठी भाषा, मराठी संस्कृती, मराठी शाळा आणि मराठी उद्योगांना जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी "विश्वमंगल मराठी फाउंडेशन" कार्यरत राहील, असे त्यांनी सांगितले. तसेच "लोकल टू ग्लोबल" आणि "ग्लोबल टू लोकल" ही संकल्पना विशद करत उपस्थितांना फाउंडेशनच्या कार्यात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन केले. याप्रसंगी आशीर्वादपर शुभ संदेश देताना श्री. विवेकजी घळसासी यांनी माननीय आमदार सुभाष बापू देशमुख यांचा उल्लेख ध्येयवेढा नेतृत्व असा करत लोकमंगल ते विश्वमंगल या गेल्या २८ वर्षांच्या प्रेरणादायी प्रवासाचा गौरव केला. मराठी भाषा, संस्कार, कुटुंबव्यवस्था आणि एकमेकांना मदतीचा हात देण्याची परंपरा जपत महाराष्ट्राला यशस्वी करण्याचे आवाहन त्यांनी केले. यानंतर परदेशातून आलेल्या मान्यवर उद्योजकांसह उद्योजक परिसंवाद आयोजित करण्यात आला. या परिसंवादात महाराष्ट्रातील नवउद्योजकांना जागतिक पातळीवर उपलब्ध असलेल्या विविध संधींबाबत चर्चा करण्यात आली तसेच उद्योगवाढीच्या मार्गांवर मार्गदर्शन करण्यात आले. "विश्वमंगल मराठी फाउंडेशन"चा सामाजिक संदेश घेऊन पंढरपूर ते आळंदी अशी सायकलवारी करणाऱ्या सायकल्स क्लब, पंढरपूरच्या सायकलवीरांचा स्वागत-सन्मान या सोहळ्यात करण्यात आला. त्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले. कार्यक्रमात युवा भारूडकार कृष्णाई उळेकर यांनी सादर केलेला "बुरगुंड" हा समाजप्रबोधनात्मक भारूड कार्यक्रम विशेष आकर्षण ठरला. या भारुडामधून फाउंडेशनची कार्यपद्धती तसेच सामाजिक उपक्रमांची प्रभावी मांडणी करण्यात आली. याशिवाय फाउंडेशनच्या आवाहनाला प्रतिसाद देत महाराष्ट्रातील विविध गावांतील जिल्हा परिषद शाळा दत्तक घेणाऱ्या उद्योजकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच आळंदी येथे "विश्वमंगल मराठी फाउंडेशन"ची पहिली स्थानिक समिती स्थापन करण्यात आली असून समितीतील सदस्यांचाही सन्मान करण्यात आला.

# ओबेन इलेक्ट्रिककडून रोर ईवीओ लाँच

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

ओबेन इलेक्ट्रिक या भारतातील संशोधन व विकास (R&D) आधारित इलेक्ट्रिक मोटरसायकल उत्पादक कंपनीने आज पहिल्या 10,000 ग्राहकांसाठी Rs. 99,999 (एक्स-शोरूम) या विशेष सुरुवातीच्या किमतीत संपूर्णपणे नवीन रोर ईवीओ च्या लाँचची घोषणा केली. या श्रेणीमध्ये स्पष्ट बदल घडवून आणण्यासाठी डिझाइन केलेल्या रोर ईवीओ मध्ये डिझाइन, परफॉर्मन्स आणि कार्यक्षमतेचे संयोजन आहे, ज्यामुळे रायडर्सना इलेक्ट्रिक मोटरसायकलकडून असलेल्या अपेक्षांना नव्या उंचीवर नेण्यात आले आहे. रायडर्सना रोमांच आणि व्यावहारिकता यांपैकी एकाची निवड करावी लागू नये, या संकल्पनेवर आधारित रोर ईवीओ निर्मिती करण्यात आली आहे. रिअल-वर्ल्ड प्रवासासाठी ही एक संपूर्ण आणि तडजोड न करणारी मोटरसायकल म्हणून डिझाइन करण्यात आली आहे. यात आक्रमक स्ट्रीटफायटर डिझाइनसह दमदार परफॉर्मन्स आणि विचारपूर्वक समाविष्ट केलेली वैशिष्ट्ये आहेत, जी राइड करताना जितका आनंद देतात तितकीच दैनंदिन वापरासाठी सुलभ देखील आहेत. पहिल्याच नजरेत, रोर ईवीओ आकर्षक, शक्तिशाली रचना आणि लक्षवेधक पवित्रासह उठून दिसते. समोरील बाजूस सिग्नेचर फ्रंट पोझीशन लॅम्पसह प्रोजेक्टर हेडलॅम्प देण्यात आला आहे, जो एक खास ओळख निर्माण करण्यासोबत दैनंदिन प्रवासात अधिक स्पष्ट दृश्यमानता देतो. सुबकपणे घडवलेले बॉडी पॅनल्स, उत्कृष्ट तपशील आणि समतोल आकाररेषा याची रस्त्यावरील उपस्थिती अधिकच ठळक करतात. Rorr EVO 110 किमी/तास टॉप स्पीड देते आणि 180 किमी आयडीसी प्रमाणित रेंज देते, ज्यामुळे आव्हानात्मक दैनंदिन प्रवासासाठी देखील तितकीच सक्षम ठरते.

# वर्ल्ड लाफ्टर डे निमित्त नेटफ्लिक्सच्या कपिल शोचा खास एपिसोड

## समय रैना आणि रणवीर अल्लाहबादिया एकत्र येऊन जबरदस्त धमाका करतील

मुंबई : (स. गांवकरी)



काही क्षण ट्रेंड होतात आणि काही "मस्ट वॉच" बनतात, आणि हा एपिसोड त्यापैकीच एक आहे जो पूर्णपणे हसण्याने भरलेला आहे. वर्ल्ड लाफ्टर डे निमित्त नेटफ्लिक्स कॉमेडीला खास बनवत द ग्रेट इंडियन कपिल शो (TGIKS) चा एक स्पेशल एपिसोड घेऊन येत आहे. या एपिसोडमध्ये कॉमेडीचे बादशाह कपिल शर्मा यांच्यासोबत नव्या पिढीतील कलाकार समय रैना आणि रणवीर अल्लाहबादिया देखील दिसणार आहेत. हा एक मजेदार क्रॉसओव्हर आहे, ज्यामध्ये जोक्स आणि सतत हसवणारे क्षण पाहायला मिळणार आहे. याबाबत कपिल शर्मा म्हणाला, "आमच्या शो ला प्रेक्षकांकडून मिळणारे प्रेम हे आम्हाला नेहमी काहीतरी नवीन आणि मजेदार कंटेंट बनवण्यासाठी प्रेरणा देते. वर्ल्ड लाफ्टर डे निमित्त आम्ही नेटफ्लिक्ससोबत मिळून एक खास एपिसोड तयार केला आहे, जो खूप मजेदार आणि भरपूर हसवणारा आहे. या एपिसोडमध्ये समय रैना आणि रणवीर अल्लाहबादिया देखील त्यांच्या खास स्टाईलमध्ये सहभागी होत आहेत, ज्यामुळे शो आणखी खास होणार आहे. आमचा उद्देश फक्त एवढाच आहे की लोकांनी आमच्यासोबत हसत-हसत आनंदाने हा दिवस साजरा करावा."

जसजशी चर्चा अधिक रंजक होत जाते, तसा स्टेज अचानक टीजीआयकेएस न्यूज डिबेटमध्ये बदलतो. ज्यात सुनील ग्रोवर मुख्य भूमिकेत दिसतो. त्यानंतर नेहमीप्रमाणे टीजीआयकेएसच्या खास स्टाईलमध्ये कृष्णा अभिषेक 'मोना' आणि किकू शारदा 'सोना'च्या भूमिकेत एंट्री करतात. दोघे मिळून संपूर्ण शो ला शेवटपर्यंत हसण्याने आणि धमाल मजेशीर वातावरणाने भरून टाकतात. वेगवेगळ्या कलाकारांची खास स्टाईल आणि टीजीआयकेएसची धमाल कॉमेडी एकत्र येऊन हा स्पेशल एपिसोड वर्ल्ड लाफ्टर डे साजरा करण्यासाठी अगदी परफेक्ट ठरतो, जिथे प्रत्येक क्षण हसण्याने भरलेला असतो. द ग्रेट इंडियन कपिल शो चा हा स्पेशल एपिसोड 2 मे रोजी फक्त नेटफ्लिक्सवर पाहायला मिळेल.

# रखडलेल्या राष्ट्रीय महामार्गामुळे जामखेड बाजारपेठेवर मोठा परिणाम

## ग्राहकांनी फिरवली पाठ : नेमके घोडे कुठे पेंड खाते हे जामखेड करांना कळायला मार्ग नाही

■ अजगररुपी राष्ट्रीय महामार्गाच्या विळख्यातुन कधी होणार जामखेडकरांची सुटका! नागरिकांची मागणी

जामखेड : (स. गांवकरी)



जामखेड शहराची बाजारपेठ राज्यात कापड, सोने, भुसार, भाजीपाला आठवडे बाजार तसेच जनावरांच्या खरेदी-विक्रीसाठी प्रसिद्ध मानली जाते.त्यामुळे येथे नेहमीच मोठ्या प्रमाणावर ग्राहकांची गर्दी होत असून शहरात लक्षणीय ओआर्थिक उलाढाल होत असते.

मात्र, जामखेड–सौताडा राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला सुरुवात झाल्यानंतर परिस्थितीत मोठा बदल झाला आहे. नियोजित वेळेत आणि योग्य पद्धतीने काम पूर्ण न झाल्यामुळे रस्त्याची अवस्था बिकट झाली असून सततची वाहतूक कोंडी नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे

बाहेरून येणाऱ्या ग्राहकांचा तासन्तास वेळ वाहतुकीत अडकून जात असल्याने त्यांनी जामखेडकडे पाठ फिरवण्यास सुरुवात केली आहे.रस्त्यावर उडणाऱ्या धुळीमुळे नागरिकांना व व्यापाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे.

पार्किंगच्या समस्येमुळे वाद वाढत असून काही ठिकाणी त्याचे रूपांतर मारामारीत होत असल्याचे चित्र आहे. याशिवाय, चोरीच्या घटना, दादागिरी, अवैध धंदे आणि टोळक्यांची दहशत यामुळेही बाजारपेठेचे वातावरण बिघडले आहे. या सर्व परिस्थितीमुळे पंचक्रोशीतील तसेच शेजारील तालुक्यांतील ग्राहकांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली असून त्याचा थेट परिणाम जामखेडच्या बाजारपेठेवर होत आहे. व्यापाऱ्यांमध्येही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, या गंभीर समस्येकडे प्रशासन, लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्यांनी तातडीने लक्ष देऊन ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. रखडलेल्या महामार्गाच्या कामामुळे निर्माण झालेल्या या 'आजाररूपी' परिस्थितीतून जामखेडकरांना लवकरात लवकर दिलासा मिळावा, अन्यथा राज्यात प्रसिद्ध असलेली जामखेडची बाजारपेठ उध्वस्त होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जामखेडची बाजारपेठ राज्यभर प्रसिद्ध असताना आज ग्राहकांनी पाठ फिरवणे ही अत्यंत गंभीर बाब आहे.यामागील मुख्य कारण म्हणजे राष्ट्रीय महामार्गाचे रखडलेले काम आणि नगरपरिषद हद्दीतील बेकायदेशीर अतिक्रमण होय.

# काळभैरवनाथ-हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात

मंचर : (स. गांवकरी)

कानसे (ता.आंबेगाव) येथील ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ व हनुमानजींच्या नव्या मूर्तींचा प्राणप्रतिष्ठा सोहळा, मंदिराचा जीर्णोद्धार आणि कलशारोहण कार्यक्रम पार पडला. वैदिक मंत्रोच्चार, शंखनाद आणि सनई-चौघड्याच्या गजरात हजारो भाविकांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. मंदिराच्या जीर्णोद्धारानंतर विविध धार्मिक विधींना सुरुवात झाली होती.गणेशपूजन, पुण्याहवाचन, अधिवास, कलश स्थापना, भजन-कीर्तन, होमहवन, नवग्रहशांती, वास्तूशांती व अभिषेक अशा विविध विधींनंतर मूर्तींची विधिवत प्राणप्रतिष्ठा पार पडली. तामिळनाडूचे पं.सुब्रह्मण्यम शास्त्री यांच्या हस्ते, तसेच संत-महंतांच्या उपस्थितीत हा सोहळा झाला. मंदिराच्या शिखरावर कलशारोहण करण्यात आले.या प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचेही



अनावरण करण्यात आले.कार्यक्रमादरम्यान "काळभैरवनाथ महाराज की जय" आणि "बजरंग बली की जय" अशा जयघोषांनी परिसर दुमदुमून गेला. या सोहळ्यास माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, पुणे म्हाडाचे अध्यक्ष माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील,भीमाशंकर साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष देवदत्त निकम यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामस्थ व विविध संस्थांनी परिश्रम घेतले.

# 'भारताची भीमज्योत' बाबासाहेबांचे संविधान मजबूत करणारी

## रामदास आठवले यांचे प्रतिपादन; भाजप अनुसूचित जाती मोर्चाच्या वतीने 'भारताची भीमज्योत' उपक्रम

पुणे : (स. गांवकरी)

"संविधानाचे शिल्पकार बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने लोहपुरुष, शक्तिपुरुष व द्रष्टे नेते होते. बाबासाहेबांच्या विचारांवर आणि संविधानाच्या तत्वांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कार्य करीत आहेत. भाजपने सर्व समाजाला सोबत घेऊन 'सबका साथ, सबका विकास' ही भूमिका मांडली असून, बाबासाहेबांचे संविधान मजबूत करण्यासाठी दीक्षाभूमी ते चैत्यभूमी असा प्रवास करत निघालेली ही भीमज्योत अवघ्या विश्वाला प्रकाशाची वाट दाखवेल," असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास



आठवले यांनी केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भाजप अनुसूचित जाती मोर्चा, महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने प्रदेशाध्यक्ष विश्वजित अनिलकुमार गायकवाड यांच्या संकल्पनेतून 'भारताची भीमज्योत' दीक्षाभूमी ते चैत्यभूमी, बाबासाहेबांच्या स्वप्नातील भारताचा अनुभव देणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. गंज पेठेतील सावित्रीबाई फुले स्मारकात झालेल्या या कार्यक्रमावेळी रामदास आठवले बोलत होते. प्रसंगी माजी मंत्री भाई गिरकर, उपमहापौर परशुराम वाडेकर, भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे, माजी खासदार सुनील गायकवाड, 'रिपाइं'चे शहराध्यक्ष संजय सोनावणे, नगरसेवक अजय खेडेकर, पल्लवी जावळे, मनीषा लडकत, अमर आवळे, नंदा आबनावे, प्रियांका शेंडगे, अर्चना जगताप, हर्षदा भोसले, वीणा घोष, निलेश आल्हाट यांच्यासह पुणे व पिंपरी-चिंचवड येथील पदाधिकारी उपस्थित होते.

रामदास आठवले म्हणाले, "दलित, सवर्ण व बहुजन समाजाला एकत्र आणण्यासाठी माझा प्रयत्न आहे. बुद्धाचे तत्वज्ञान अंगीकारत बाबासाहेबांनी संपूर्ण मानवजातीचे कल्याण करणारे संविधान देशाला दिले. संविधान कोणीही बदलू शकत नाही. काँग्रेस आणि विरोधी पक्ष केवळ तशा वावड्या उठवत आहे. मात्र, चैत्यभूमीवर भव्य स्मारक साकारण्यात नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांनीच पुढाकार घेतल्याचे आपण पाहिले. विश्वजित गायकवाड यांच्यासारख्या युवकाला पाठबळ देण्याचे काम भाजप करीत आहे. मी ज्यांच्यासोबत असतो, त्यांची सत्ता आल्याशिवाय राहत नाही. जोवर मी भाजपसोबत आहे, तोवर भाजपाची सत्ता येणार असून, मला चौथ्यांदा मंत्री होण्याची संधी मिळणार आहे."

"पश्चिम बंगालमध्ये भाजपची सत्ता येणार आहे. ममता बॅनर्जी व अन्य नेत्यांनी पराभव स्वीकारून जिंकून येणाऱ्या भाजपचे अभिनंदन करायला हवे. देशात महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्यासाठी एनडीए सरकार कटिबद्ध असून, पुढील काळात याबाबत जागृती करून हे विधेयक पारित करू. दलित समाजाची ताकद मोठी असून, कोणाला पडायचे आणि कोणाला निवडून आणायचे, हे माझ्या हातात आहे. काँग्रेसने महिलांना जसा विरोध केला, तसा मलाही केला होता. पंढरपूरमधून खासदार झाल्यावर मंत्री केले नव्हते, तर शिर्डीमध्ये मला जाणूनबुजून पराभूत केले होते, त्यामुळे मी काँग्रेसची साथ सोडून भाजपमध्ये गेलो आणि भाजपाची सत्ता आली," असेही आठवले यांनी नमूद केले.